# महाराष्ट्र विधानपरिषद

## पहिले अधिवेशन, २०१८

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**बुधवार, दिनांक २१ मार्च, २०१८ / फाल्गुन ३०, १९३९ (शके)**

| | |
|---|---|
| **(१) मुख्यमंत्री**<br>**(२) गृहनिर्माण मंत्री**<br>**(३) कामगार, भूकंप पुनर्वसन, कौशल्य विकास, माजी सैनिकांचे कल्याण मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ८४**

---

### ठाणे शहरातील सोहम बिल्डर्सने गैरव्यवहार केल्याबाबत

**(१) * ३८५०० प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे शहरातील सोहम बिल्डर्सचे मालक चैतन्य पारेख व नरेंद्र शहा यांनी एका जागेवर मंजूर झालेला विकास प्रस्ताव असताना दुसऱ्या जागेवर पुनर्विकास प्रस्ताव मंजूर करुन एफएसआय वापरुन टोलेजंग इमारती बांधून सुमारे २०० कोटी रुपयांचा गैरव्यवहार केला असल्याची बाब माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ठाणे जिल्ह्यातील महसूल विभागातील अधिकारी हे सोहम बिल्डर्सच्या मालकांना पाठीशी घालत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, भ्रष्ट महसूल अधिकारी व कर्मचाऱ्यांविरुध्द तसेच सोहम बिल्डर्सच्या मालकांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सोहम बिल्डर्सच्या संचालकांची मालमत्ता जप्त करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) अश्या स्वरुपाचा तक्रार अर्ज शासनास प्राप्त झाला असून, त्यावर आयुक्त, ठाणे महानगरपालिका यांचा अहवाल मागविण्यात आला आहे. तसेच काही अर्ज आयुक्त, ठाणे महानगरपालिका यांचेकडे उचित कार्यवाहीकरीता पाठविण्यात आले आहेत.
(२), (३) व (४) सदर प्रकरणी आयुक्त, ठाणे महानगरपालिका यांचा अहवाल प्रात झाल्यावर त्यानुसार उचित कार्यवाही करण्याची शासनाची भूमिका आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळात गैरप्रकार झाल्याबाबत

**(२) * ३८४९५ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.धनंजय मुंडे, श्री.सतिश चव्हाण, श्री.अमरसिंह पंडित : तारांकित प्रश्न क्रमांक ३५४१२ ला दिनांक २० डिसेंबर, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाचे अध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी व संबंधितांनी पदाचा व अधिकाराचा दुरूपयोग करून केलेल्या गैरप्रकाराची चौकशी करण्याबाबत तसेच त्यांना अटक करण्याबाबतची मागणी परभणी येथील स्थानिक लोकप्रतिनिधींनी सहपोलीस आयुक्त, पोलीस आयुक्तालय, औरंगाबाद यांच्याकडे माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान लेखी निवेदनाव्दारे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सह पोलीस आयुक्त, पोलीस आयुक्तालय, औरंगाबाद यांनी सर्व पुराव्यांची तपासणी करून दोषी अध्यक्ष, मुख्य कार्यकारी अधिकारी व संबंधितांविरूध्द गुन्हे नोंदवून त्यांना अटक केली आहे काय,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

पोलीस आयुक्त, औरंगाबाद (शहर) यांच्याकडे निवेदन प्राप्त आहे.

(२) प्राप्त निवेदनाच्या अनुषंगाने आर्थिक गुन्हे शाखा, औरंगाबाद यांच्याकडून चौकशी सुरू आहे.

या प्रकरणी अल्पसंख्याक विकास विभागाने त्यांच्या दिनांक ११/०८/२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये सदर भाडेकरार रद्द करुन सदरची मालमत्ता वक्फ मंडळाकडे पुर्ववत करण्याविषयी कार्यवाही करण्याबाबत तसेच, सदर वक्फ संस्थेच्या मौल्यवान मालमत्तेचे रक्षण करण्यास असमर्थ असलेल्या मुतवल्लीला कायदेशीर प्रक्रिया राबवून पदावरुन हटवून सदर वक्फ मालमत्ता वक्फ मंडळाच्या ताब्यात घेण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही करण्याचे निदेश देण्यात आले आहेत.

तसेच वक्फ अधिनियम १९९५ चे कलम ३२ आणि ५६ चे तरतूदींचा भंग झाल्याबाबत तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी यांची राज्य गुन्हे अन्वेषण विभाग, औरंगाबाद यांच्याकडून चौकशी करण्यात येत आहे.

(३) विलंब झालेला नाही.

-----------------

## मुंबईतील माहुलगाव येथील प्रकल्पग्रस्तांच्या समस्या सोडविणेबाबत

**(३) * ३८८३४ श्रीमती विद्या चव्हाण, श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील माहुलगाव येथे एम.एम.आर.डी.ए. मार्फत बांधण्यात आलेल्या निवासी इमारतींमध्ये महापालिकेच्या विविध प्रकल्पग्रस्त सुमारे ५००० कुटुंबांचे पुनर्वसन करण्यात आले असून उक्त कुटुंबांना देण्यात आलेल्या घरांची अवस्था फारच बिकट असून निकृष्ट दर्जाचे बांधकाम, देखभालीचा अभाव असल्यामुळे याचा नागरिकांना मोठ्या प्रमाणात त्रास होत असल्याचे दिनांक २६ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वीज, पाणीटंचाई, फुटलेल्या सांडपाणी वाहिन्यांमुळे परिसरात दुर्गंधी पसरली असून डासांचा प्रादुर्भाव व त्यामुळे होणारे आजार अशा परिस्थितीत नागरिकांना रहावे लागत आहे तसेच मद्यपी टोळक्याकडून महिला व मुलींची छेडछाड होत असून अशा अमानवी वातावरणात लोक आपले जीवन व्यतित करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, माहुलगाव परिसरात असलेल्या १० ते १२ रासायनिक कंपन्यामुळे होणाऱ्या हानीकारक प्रदूषित घटकांमुळे रहिवाश्यांच्या आरोग्यावर वाईट परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) माहुलगांव येथे एसआरए मार्फत बांधण्यात आलेल्या व महानगरपालिकेकडे हस्तांतरीत केलेल्या ४५ इमारती या महानगरपालिकेच्या विविध प्रकल्प बाधित प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी वितरीत करण्यात आलेल्या आहेत.

सद्य:स्थितीत ५,०७७ सदनिका विविध प्रकल्पग्रस्तांना वितरीत करुन प्रत्यक्ष ताबा दिला आहे.

"पुनर्वसन नव्हे, वनवास" अशा आशयाची बातमी दिनांक २६/१२/२०१७ रोजीच्या लोकसत्ता या वर्तमानपत्रात प्रसिध्द झाली होती ही वस्तुस्थिती आहे.

तथापि, सदर इमारती व परिसर राहण्यास योग्य असल्याबाबतचा निर्वाळा मा.सर्वोच्च न्यायालयाने नियुक्त केलेल्या समितीने सीपीसी क्रमांक ६२१/२०१५ मध्ये दिनांक २७/११/२०१५ रोजी दिला आहे.

सद्य:स्थितीत या इमारतींतील रहिवाशांना महानगरपालिकेमार्फत खालील सेवा व सुविधा पुरविण्यात येत आहेत :-

- २४ तास पाणीपुरवठा करण्यात येतो.
- रिलायन्स एनर्जीतर्फे २४ तास वीज पुरवठा करण्यात येतो.
- किटक नियंत्रण विभागामार्फत नियमितपणे धुम्र फवारणी केली जाते.

- इमारतींच्या परिसरातील कचरा महानगरपालिकेमार्फत नेमण्यात आलेल्या संस्थेमार्फत नियमितपणे उचलण्यात येतो.
- सार्वजनिक आरोग्य केंद्र व दवाखाना सुरु करण्यात आला असून २ वैद्यकीय अधिकारी नियुक्त करण्यात आले आहेत. तसेच, सदर परिसरात आवश्यकतेनुसार आरोग्य शिबिराचे आयोजन केले जाते.
- महानगरपालिकेच्या आरोग्य विभागामार्फत नियमितपणे आरोग्य सर्वेक्षण करण्यात येत असून सदर सर्वेक्षणात तापाचे रुग्ण आढळल्यास त्यांच्यावर वेळोवेळी उपचार केले जातात.
- इमारतींतील सांडपाण्याचा निचरा करण्यासाठी उभारण्यात आलेले मलनि:सारण केंद्राच्या दुरुस्तीचे काम कार्यान्वित असून जुलै, २०१८ अखेर पूर्ण होईल.
- सदर इमारतींमध्ये सदनिका वाटप केल्यानंतर आवश्यकतेनुसार किरकोळ दुरुस्तीची कामे वेळोवेळी करण्यात येतात.
- सदर इमारतींची सर्वंकष दुरुस्ती करण्यासाठी निविदा मागविण्यात आल्या असून, सदर दुरुस्तीची कामे मार्च, २०१८ अखेरपर्यंत सुरु करण्यात येणार आहेत.
- संपूर्ण इमारतींची एकवेळ दुरुस्ती करुन इमारतींचा ताबा सहकारी गृहनिर्माण संस्थेस देण्यात येणार आहे.

तसेच, सदर ठिकाणी मद्यपि टोळक्यांकडून महिला व मुलींच्या छेडछाडीबाबत कोणतीही घटना किंवा गुन्हा दाखल असल्याची नोंद आर.सी.एफ. पोलीस ठाण्याच्या अभिलेखात आढळून आलेली नाही.

(३), (४) व (५) राष्ट्रीय हरीत लवादाच्या आदेशानुसार माहुल येथील हवेची गुणवत्ता तपासणी व त्यामुळे आरोग्यावर होणाऱ्या परिणामाबाबतचा अभ्यास नीरी व के.ई.एम. हॉस्पिटल यांचेमार्फत करण्यात येत आहे.

याबाबतचा अंतिम अहवाल प्रलंबित आहे.

-----------------

## उल्हासनगर महानगरपालिका विनाप्रक्रिया सांडपाणी उल्हास नदीपात्रात सोडत असल्याबाबत

**(४) * ३७८२८ श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.धनंजय मुंडे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर महानगरपालिका हद्दीत ६४ एम.एल.डी. इतके घरगुती सांडपाणी निर्माण होत असून सदरील सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी कुठल्याही प्रकारचा सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प महानगरपालिकेकडे अस्तित्वात नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त महानगरपालिका हद्दीतील विनाप्रक्रिया सांडपाणी उल्हास नदीपात्रात सोडण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात सन २०१३ पासून वनशक्ती संस्थेने सातत्याने उक्त महानगरपालिका जाणीवपूर्वक उल्हासनदीचे पाणी प्रदूषित करत असल्याच्या तक्रारी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण महामंडळाकडे केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी प्रदूषण नियंत्रण मंडळाने उक्त महानगरपालिकेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१), (२), (३), (४) व (५) उल्हासनगर शहरामध्ये सध्या अंदाजे ६० ते ७० एमएलडी इतके सांडपाणी तयार होते.

तथापि, अस्तित्वातील जलशुध्दीकरण केंद्र व मलवितरणवाहिन्या सन २००५ च्या महापुरामध्ये नादुरुस्त झाल्याने सध्या शहरातील सांडपाणी वालधुनी नदीमार्फत उल्हास नदीमध्ये मिसळत आहे, हे खरे आहे.

उल्हासनगर महानगरपालिकेमार्फत याबाबत खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येत आहेत.

१. उल्हासनगर मनपा क्षेत्रातील खेमाणी नाल्यावर बंधारा बांधून १५ एमएलडी सांडपाण्यावर प्रक्रिया करण्याच्या अनुषंगाने रुपये ३६ कोटी किंमतीची योजना उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्वनिधीतून राबविण्यात येत आहे.

२. अमृत अभियानांतर्गत शहरातील सांडपाण्यावर प्रक्रिया करण्याच्या अनुषंगाने रुपये ९४.११ कोटी किंमतीच्या योजनेस दोन टप्प्यामध्ये शासनाने मान्यता दिली आहे.

३. सदर योजनेतून एकूण ५९.९८ एमएलडी सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यात येणार आहे.

४. यापैकी टप्पा क्रमांक १ चे काम प्रगतीपथावर असून टप्पा क्रमांक २ चे काम निविदाधीन आहे.

उल्हास नदीच्या प्रदूषणाच्या अनुषंगाने वनशक्ती फाऊंडेशन या संस्थेने याबाबत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे तक्रारी केलेल्या आहेत तसेच याबाबत मा.राष्ट्रीय हरित लवादाकडे सुध्दा अपील करण्यात आलेले होते.

सद्य:स्थितीमध्ये सदर प्रकरण मा.सर्वोच्च न्यायालयामध्ये न्यायप्रविष्ट आहे.

-----------------

## मुंबई महापालिकेतील एका महिला सफाई कामगाराने आत्महत्या केल्याबाबत

**(५) * ३८६२३ श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.रामनिवास सिंह, श्रीमती स्मिता वाघ, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले, श्री.नागोराव गाणार, प्रा.अनिल सोले, श्री.गिरीशचंद्र व्यास :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील विलेपार्ले येथील नेहरूनगर मध्ये राहणाऱ्या महानगरपालिकेच्या के/पश्चिम विभाग कार्यालयात कार्यरत असलेल्या श्रीमती सुमती देवेंद्र या महिला सफाई कामगाराने गळफास लावून आत्महत्या केल्याची घटना माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा.न्यायालयाच्या आदेशानुसार तिच्यासह अनेक कंत्राटी कामगारांना सफाईचे काम दिले जात होते पण त्यानंतर महानगरपालिका अधिकाऱ्यांकडून तिला काम देण्यास नकार दिल्यामुळे तिने आत्महत्या केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मा.न्यायालयाच्या आदेशाचे पालन न करणाऱ्या अधिकाऱ्यांवर शासनाने चौकशी करून कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या के/पश्चिम विभागात कंत्राटी तत्वावर कार्यरत असणाऱ्या सफाई कामगार श्रीमती सुमती देवेंद्र यांचा दिनांक ०२/०१/२०१८ रोजी मृत्यू झाला ही वस्तुस्थिती आहे.
(२) व (३) मा.उच्च न्यायालयाने कचरा वाहतुक श्रमिक संघटनेच्या ६०% कामगारांना अशासकीय संस्थांमार्फत सफाईचे काम देण्याबाबत आदेश दिले आहेत.

बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत सफाई कामाकरीता अशासकीय संस्थांची निविदा प्रक्रियेद्वारे ६ महिन्यांकरीता नियुक्ती करण्यात येते व सदर संस्थांमार्फत कंत्राटी सफाई कामगार पुरविण्यात येतात.

सदर सफाई कामगारांना अशासकीय संस्थांमार्फत वेतन अदा करण्यात येते व अशासकीय संस्थांनी सफाई कामगारांच्या बँक खात्यात वेतन जमा केल्याची खातरजमा केल्यानंतर त्याची प्रतिपूर्ती बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत करण्यात येते.

श्रीमती सुमती देवेंद्र या दिनांक १ जून, २०१७ ते दिनांक ३० नोव्हेंबर, २०१७ या कालावधीत “प्रियांका बेरोजगार सेवा सहकारी संस्था मर्यादित” या अशासकीय संस्थेकडे व दिनांक ०१/१२/२०१७ ते ०१/०१/२०१८ या कालावधीत “नगर ग्रामविकास मंडळ” या अशासकीय संस्थेकडे कामावर होत्या.

त्यांनी केलेल्या कामाचे मागील ६ महिन्यांचे वेतन त्यांना अशासकीय संस्थांमार्फत अदा केल्याचे बँकेच्या विवरणपत्रावरुन दिसून येते.

त्यामुळे श्रीमती सुमती देवेंद्र यांना काम देण्यास नकार दिला अशी वस्तुस्थिती नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## म्हाडाच्या संक्रमण शिबिरातील रहिवाश्यांच्या मुळ कागदपत्रांच्या नस्ती गहाळ झाल्याबाबत

**(६) * ३८००० श्री.नरेंद्र पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.सुनिल तटकरे, श्री.धनंजय मुंडे, श्री.किरण पावसकर, श्री.जयवंतराव जाधव, ॲड.निरंजन डावखरे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.जगन्नाथ शिंदे, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) म्हाडाच्या संक्रमण शिबिरातील रहिवाश्यांच्या मुळ कागदपत्रांच्या ४० ते ४५ नस्ती म्हाडाकडून गहाळ झाल्याने याप्रकरणी जबाबदारी निश्चित करण्यासाठी शासनाने व्दिसदस्यीय समिती स्थापन केली असल्याची बाब माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी नियुक्त व्दिसदस्यीय समितीचा अहवाल शासनाला प्राप्त झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर अहवालाच्या अनुषंगाने शासनाने दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश महेता :** (१) अंशत: खरे आहे.

सदर प्रकरणांची चौकशी करणेकामी मा.मुख्य अधिकारी, दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या दिनांक २९/०९/२०१७ च्या आदेशान्वये उपमुख्य अधिकारी (पुनर्रचित गाळे), तसेच उपमुख्य अधिकारी (संक्रमण शिबीरे) यांची व्दिसदस्यीय समिती स्थापन करण्यात आली आहे.

(२) सदर व्दीसदस्यीय समितीचा अहवाल अद्याप शासनास प्राप्त झालेला नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे येथील लोहगाव विमानतळाच्या विस्तारीकरणाबाबत

**(७) * ३९०२२ आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.हेमंत टकले, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील लोहगाव विमानतळाच्या विस्तारीकरणासाठी खाजगी मालकीच्या २१ एकर जमिनीच्या संपादनासाठी या जमिनी पुणे महापालिकेच्या सूट आराखडयात (एक्जेम्पंशन प्लॅन-ईपी) वर्ग करण्यात याव्यात असा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात आला असल्याचे दिनांक २० डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या जमिनीची किंमत रुपये ६० ते ७० कोटी इतकी आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रस्तावावर निर्णय घेण्याबाबत व भूसंपादनांसाठी निधीची तरतूद करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) ते (३) जिल्हाधिकारी पुणे यांनी दिनांक ०४/१२/२०१७ रोजीचे पत्रान्वये पुणे महानगरपालिकेच्या विकास आराखडयात मौजे लोहगाव येथे स.नं. २३७(भाग) मधील प्रतिबंधित क्षेत्रावर पार्किंगचे आरक्षण व स.नं. २४८(भाग) व २५३(भाग) क्षेत्रावर ऑफिस कॉम्प्लेक्स व स्टोअरेज यार्डचे आरक्षण दर्शविणेबाबतची विनंती केली होती. यानुसार सदर जागा आरक्षित करणेकरीता महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(१कक) अन्वयेची सूचना शासनाने दिनांक २३/०२/२०१८ रोजी प्रसिध्द केली असून यावर प्राप्त होणाऱ्या सूचना/हरकतीं बाबत सुनावणी देवून शासनास अहवाल सादर करणेसाठी सहसंचालक, नगररचना, पुणे विभाग, पुणे यांची नियुक्ती केलेली आहे. याबाबतची

वैधानिक कार्यवाही पुर्ण झाल्यानंतर सदर जागा नवीन भूसंपादन कायद्यानुसार नुकसान भरपाई देवून अथवा हस्तांतरणीय विकास हक्काच्या माध्यमातून संपादन करता येईल. त्यामुळे सद्य:स्थितीत भूसंपादनासाठी निधीची तरतूद करण्याची आवश्यकता नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे येथील वारजे, तळजाई व हाडेवाडी रस्त्यावर गुंडांनी वाहने व एटीएमची तोडफोड केल्याबाबत

**(८) * ३८२१५ ॲड.जयदेव गायकवाड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे येथील वारजे, तळजाई व हाडेवाडी रस्त्यावर दहशत बसण्यासाठी सराईत ५ गुंडांच्या टोळक्यांनी वाहने व एटीएमची तोडफोड केल्याची घटना माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान घडल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त घटनेची शासनामार्फत चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार सदर सराईत गुंडाच्या टोळक्यांवर कारवाई करून त्यांच्याकडून नुकसान भरपाई घेणेबाबत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) माहे डिसेंबर, २०१७ मध्ये पुण्यात वारजे, तळजाई व हाडेवाडी रस्त्यावर तीन वेगवेगळ्या घटना घडल्या असून त्यात खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आली आहे.

अ) वारजे येथे ३ आरोपींनी जुन्या भांडणाच्या कारणावरून फिर्यादीच्या घरावर दगड फेक करून त्याच्या घराजवळ पार्क केलेल्या टेंम्पो, रिक्षा व मोटार सायकलीच्या काचा बांबूने फोडल्यामुळे ३ आरोपींविरूध्द वारजे माळवाडी पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. ४३५/२०१७, भादंवि कलम १४३, १४७, १४८, १४९, ४२७, म.पो.ॲक्ट कलम ३७(१) सह १३५ प्रमाणे गुन्हा दाखल करून तीनही आरोपींना अटक करण्यात आली आहे.

ब) तळजाई वसाहत, पद्मावती, पुणे या ठिकाणी ४ आरोपी व ३ विधी संघर्षित बालकांनी बेकायदेशीररीत्या एकत्र जमून, घातक शस्त्राने दंगा करण्याच्या व परिसरात दहशत बसविण्याचा उद्देशाने तेथे पार्क केलेल्या ४३ वाहनाचे सिट कव्हर्स फाडले या कारणामुळे सहकार नगर पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. ३८०/२०१७ भादंवि कलम १४३, १४४, १४५, १४७, १४८, १४९, ४२७, क्रिमीनल लॉ अमेंडमेंट कलम ७ प्रमाणे गुन्हा नोंद दाखल करून ४ आरोपींना अटक करण्यात आली आहे.

क) इंदिरा नगर, हांडेवाडी रोड, पुणे या ठिकाणी ८ आरोपींनी येवून रोडचे आजुबाजूला असणाऱ्या वाहनांची व तेथेच असलेल्या बँकेच्या एटीएम मशीनची तोडफोड केली व फिर्यादीच्या हातगाडीचे नुकसान करून त्याचे मुलीला शिवीगाळ करून घरातील सामानाची नासधुस केल्यामुळे ८ आरोपींविरूध्द कोंढवा पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. ५४६/२०१७ भादंवि कलम ३२४, १४३, १४४, १४७, १४९, ४२७, ४५२ व क्रिमीनल लॉ अमेंडमेंट कलम ७ प्रमाणे गुन्हा दाखल करून ३ आरोपींना अटक करण्यात आली आहे.

उपरोक्त तीनही गुन्हे तपासावर आहेत.

-----------------

## नंदुरबार शहरातील वाढती गुन्हेगारी रोखण्याबाबत

**(९) * ३९०२८ श्री.चंद्रकांत रघुवंशी, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.आनंदराव पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नंदुरबार शहरात अवैध दारु व्यवसाय, जुगार, सट्टा व मटका इत्यादी अवैध धंदे तसेच चोरी व लुटमारीचे प्रकार मोठ्या प्रमाणात वाढले असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त शहरात माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान १५० मोटार सायकली चोरीला गेल्याचे निदर्शनास आले असून या प्रकरणातील आरोपीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, शहरात अवैध धंदे वाढत असतानाही याकडे स्थानिक पोलीस प्रशासनाचे दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार अवैध धंद्यांना आळा घालण्याबाबत तसेच उक्त शहरातील वाढती गुन्हेगारी रोखण्यासाठी कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे, खरे नाही.
(२) सन २०१७ मध्ये नंदुरबार शहरात एकूण ४८ मोटार सायकल चोरीचे गुन्हे घडले असून, त्यापैकी १२ गुन्हे उघड झाले आहेत.
(३) हे खरे नाही.
(४) शहरात अबकारी विभाग, स्थानिक पोलीस स्टेशन व स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा यांचे संयुक्त/स्वतंत्र भरारी पथक मार्फत कार्यवाही करण्यात येते. तसेच अशा प्रकारचे गुन्हे करणाऱ्या आरोपींचा शोध घेतला जातो व निष्पन्न आरोपीतांवर प्रभावी प्रतिबंधात्मक कार्यवाही करण्यात येते.
(५) विलंब झालेला नाही.

-----------------

## ठाणे-भिवंडी-कल्याण या मार्गावरील मेट्रो-५ प्रकल्पाबाबत

**(१०) * ३७७६८ श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर : तारांकित प्रश्न क्रमांक ३३५०० ला दिनांक ९ ऑगस्ट, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई महानगरक्षेत्रात मेट्रोचे जाळे अधिक विस्तारित करण्यासाठी ठाणे-भिवंडी-कल्याण दरम्यान मेट्रो-५ प्रकल्पास राज्य शासनाने मंजूरी दिली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकल्पाची सुरुवात कधी व पुर्ण करण्यास किती कालावधी लागणार आहे,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरील प्रकल्पाची सुसाध्यता व आर्थिक नियोजनासंबंधी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२), (३) व (४) सदर प्रकल्पाचे काम माहे जून, २०१८ पासून सुरू होत असून माहे मे, २०२२ अखेर मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत पूर्ण होणे अपेक्षित आहे. सदर प्रकल्पाची अंमलबजावणी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत करण्यात येणार आहे. या प्रकल्पाच्या स्थापत्य कामाचा खर्च मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत करण्यात येणार असून प्रणाली आणि रेल्वे डबे या वरील खर्चासाठी इतर बाह्य आर्थिक संस्थेकडून कर्ज सहाय्य घेण्याचे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत नियोजित आहे.

-----------------

## नागपूर शहरातील गुन्हेगारीला प्रतिबंध घालणेबाबत

**(११) * ३७७०७ श्री.प्रकाश गजभिये, श्री.गिरीशचंद्र व्यास, प्रा.अनिल सोले :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील सी.जी.ओ कॉम्पलेक्स मधील कार्यालयात कार्यरत असलेल्या एका कर्मचाऱ्याची आकाशवाणी चौकात हत्या झाल्याची घटना दिनांक २ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी करून गुन्हेगारावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, नागपूर शहर गुन्हेगारीत राज्यात अव्वल क्रमांकावर असून शहरात गुन्हेगारीत वाढ होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, गुन्हेगारीला प्रतिबंध घालणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.
(२) दिनांक ०१/०१/२०१८ रोजी पोलीस स्टेशन सिताबर्डी येथे गु.र.नं. ०१/२०१८ कलम ३०२ भा.दं.वी प्रमाणे अज्ञात आरोपीविरुध्द गुन्हा नोंदविण्यात आला आहे. गुन्हयाचा तपास सुरु आहे.
(३) व (४) हे खरे नाही. तथापि गुन्हेगारीला प्रतिबंध घालणेकामी नागपूर शहर पोलीस आयुक्तालयांतर्गत सन २०१७ मध्ये एकूण ७५२१ तर माहे जानेवारी, २०१८ मध्ये ५९४ प्रतिबंधात्मक कार्यवाही करण्यात आल्या आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## उरण येथील जेएनपीटी बंदरात तस्करी होत असल्याबाबत

**(१२) * ३८६८१ श्री.जयंत पाटील, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, डॉ.सुधीर तांबे, डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.सुनिल तटकरे, श्री.धनंजय मुंडे, श्री.किरण पावसकर, श्री.जयवंतराव जाधव, ॲड.निरंजन डावखरे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.जगन्नाथ शिंदे, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उरण (जि.रायगड) तालुक्यातील जेएनपीटी बंदरात दिनांक २९ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास जीडीएल नावाच्या गोदामात ५० किलो सोने व दिनांक ३ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास ग्लोबिकॉन नामक गोदामात १५ किलो सोने महसूल गुप्तचर संचालनालय यांनी धाड टाकून कोट्यवधी रूपयांचा माल हस्तगत केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यापुर्वी उरण जेएनपीटी बंदरामध्ये ‘ग्लोबिकॉन लॉजिस्टिक’ याच कंपनीच्या कंटेनरमध्ये रक्तचंदन व एल.सी.डी. टी.व्ही हस्तगत करण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर बंदरात स्कॅनिंग मशीनची संख्याही कमी प्रमाणात आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन बंदरात होत असलेल्या तस्करी थांबविण्यासाठी व सदर कंपनीचे व्यवस्थापनावर कारवाई करुन कंपनी बंद करणेबाबत काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) महसूल गुप्तचर संचालनालय ही केंद्र शासनाच्या अधिपत्याखालील यंत्रणा आहे. सदर यंत्रणेकडील कामकाजावर राज्य शासनाचे नियंत्रण नाही.

तथापि, महसूल गुप्तचर संचालनालयाने माहे डिसेंबर, २०१७ व जानेवारी, २०१८ मध्ये जे.एन.पी.टी. बंदरात ५७ किलो सोने जप्त केले असल्याचे कळविले आहे.
(२) अशा प्रकारची नोंद उरण पोलीस ठाण्याच्या अभिलेखावर नाही. तसेच ग्लोबिकॉन लॉजिस्टिक या कंपनीवर केंद्रिय महसूल गुप्तचर संचालनालयाने कारवाई केली नसल्याचे कळविले आहे.
(३) व (४) सदरची बाब केंद्र शासनाच्या अखत्यारीतील सीमा शुल्क विभागाशी संबंधित आहे. तथापि, बंदरातील प्रतिबंधित उपाययोजनांचे काम केंद्र सरकारच्या अधिपत्याखालील मुख्य गुप्तचर शाखा, विशेष तपास गुप्तचर शाखा (आयात), विशेष तपास गुप्तचर शाखा (निर्यात) यांच्यामार्फत मालाची तपासणी इत्यादी बाबी राबविल्या जातात.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील असंघटित कामगारांसाठी कल्याणकारी योजना राबविण्याबाबत

**(१३) * ३८३१४ श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, श्रीमती विद्या चव्हाण :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील असंघटित कामगारांच्या कल्याणासाठी उपकराच्या माध्यमातून गोळा झालेल्या ४७१६ कोटी रुपयांपैकी शासनाने कामगारांच्या कल्याणासाठी फक्त २२७ कोटी रुपये खर्च केल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कामगारांच्या कल्याणासाठी निधी खर्च करण्यात यावा असे आदेश मा.पंतप्रधान कार्यालयाकडूनही राज्य शासनास दिल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, इतक्या मोठ्या प्रमाणात निधी असूनही कामगारांसाठी ठोस योजना राबविण्यात शासनास अपयश येत असून कामगारांसाठी कल्याणकारी योजना राबविण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संभाजी पाटील-निलंगेकर :** (१) हे अंशत: खरे आहे.

महाराष्ट्र इमारत व इतर कामगार कल्याणकारी मंडळाकडे उपकरापोटी माहे जानेवारी, २००८ ते डिसेंबर, २०१७ पर्यंत एकूण रक्कम रुपये ५९१३.०५ कोटी जमा झालेली असून मुख्यालय व जिल्हा कार्यालयांकडून विविध कल्याणकारी योजना व प्रशासकीय खर्चाकरीता माहे डिसेंबर, २०१७ पर्यंत रक्कम रुपये २९३.१२ कोटी एवढा निधी खर्च करण्यात आलेला आहे.

(२) हे खरे आहे.

मा.पंतप्रधान कार्यालयाकडून राज्य शासनास दिनांक २१/०८/२०१७ रोजी संपन्न झालेल्या बैठकीमध्ये उपकरांतर्गत जमा होणारा निधी बांधकाम कामगारांच्या विविध कल्याणकारी योजनांवर योग्य प्रकारे विनियोग/खर्च करण्याबाबत निर्देश देण्यात आलेले आहेत.

(३) महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार मंडळांतर्गत नोंदीत पात्र बांधकाम कामगार आणि त्यांच्या पाल्यासाठी खालील योजना राबविण्यात येत आहेत.

अ) पुरुष बांधकाम कामगाराच्या पत्नीस/स्त्री बांधकाम कामगाराच्या पतीस आणि त्यांच्या पाल्यासाठी शैक्षणिक योजना

ब) बांधकाम कामगार आणि त्यांच्या कुटुंबासाठी वैद्यकीय योजना

क) बांधकाम कामगारांच्या विवाहाकरिता अर्थसहाय्य

ड) बांधकाम कामगार व त्यांच्या कुटुंबाकरिता महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य विमा योजना

इ) बांधकाम कामगारांसाठी कौशल्यवृध्दी प्रशिक्षण

फ) बांधकाम कामगारांना घरबांधणीकरिता अर्थसहाय्य

ज) बांधकाम कामगारांना अवजारे खरेदी करण्याकरिता अर्थसहाय्य

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## यवतमाळ नगरपरिषदेत विलिन केलेल्या ग्रामपंचायतीतील कर्मचाऱ्यांना नगरपरिषद कर्मचाऱ्यांप्रमाणे वेतन देणेबाबत

**(१४) * ३८२९० श्री.ख्वाजा बेग, श्री.हेमंत टकले, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ नगरपरिषदेची हद्दवाढ होऊन शहरालगत असणाऱ्या ८ ग्रामपंचायतीचे सन २०१६ मध्ये नगरपरिषदेत विलिनीकरण करण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या विलिनीकरणामुळे सदर ८ ग्रामपंचायतीमधील कार्यरत असलेल्या एकूण २१९ कर्मचाऱ्यांना सन २०१६ मध्ये नगरपरिषदेत समाविष्ट करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वेगवेगळया ग्रामपंचायतीमधून आलेल्या आणि एकाच पदावर कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांना देण्यात येणाऱ्या वेतनामध्ये तफावत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, विलिनीकरण होऊन सुमारे १८ महिन्याचा कालावधी होऊन सुध्दा त्या सर्व कर्मचाऱ्यांना ग्रामपंचायत प्रमाणे वेतन देण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त विलिनीकरण करण्यात आलेल्या ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना नगरपरिषद कर्मचाऱ्यांप्रमाणे वेतन देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस** : (१) यवतमाळ नगरपरिषदेची हद्दवाढ होऊन ७ ग्रामपंचायती व आठव्या ग्रामपंचायतीमधील डोळंबा या भागाचे सन २०१६ मध्ये नगरपरिषदेत विलिनीकरण झाले आहे.

(२), (३), (४) व (५)

- शासनाच्या धोरणानुसार प्राथमिक उद्घोषणा निर्गमित करण्यापूर्वीच्या दिनांकापासून ग्रामपंचायतीत कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांना सुधारित आकृतिबंधाच्या मर्यादेत शासन मान्यतेने सामावून घेण्यात येते.
- समावेशनास मान्यता देण्यात आल्यानंतर त्यांना नियमित वेतनश्रेणी देण्यात येते. तोपर्यंत त्यांना ग्रामपंचायतीत मिळत असणाऱ्या मानधनाएवढेच वेतन प्रदान करण्यात येते.
- हद्दवाढीमुळे नव्याने समाविष्ट झालेल्या ग्रामपंचायतीमधील २१९ कर्मचाऱ्यांना सुरुवातीस तात्पुरत्या स्वरुपात यवतमाळ नगरपरिषदेत सामावून घेण्यात आले.
- गटविकास अधिकारी, यवतमाळ यांनी त्यानंतर प्राथमिक उद्घोषणा निर्गमित करण्यापूर्वीच्या दिनांकापासून ग्रामपंचायतीत कार्यरत असलेल्या २१३ कर्मचाऱ्यांची प्रमाणित यादी नगरपरिषदेस दिली. त्यामुळे तात्पुरत्या सामावून घेतलेल्या २१९ कर्मचाऱ्यांपैकी प्रमाणित यादीत समावेश नसलेल्या ६ कर्मचाऱ्यांच्या सेवा नगरपरिषदेने समाप्त केल्या.
- गटविकास अधिकारी, यवतमाळ यांनी प्राथमिक उद्घोषणा निर्गमित करण्यापूर्वीच्या दिनांकापासून ग्रामपंचायतीत कार्यरत असल्याचे प्रमाणित केलेल्या व त्याआधारे तात्पुरते समावेशन करण्यात आलेल्या २१३ कर्मचाऱ्यांपैकी ८६ कर्मचारी हे प्राथमिक उद्घोषणेच्या दिनांकानंतर ग्रामपंचायतीत नियुक्त झाल्याचे निदर्शनास आले आहे. यांच्या सेवा जिल्हा परिषदेकडे परत करण्यात येत आहेत. तसेच, खोटे प्रमाणपत्र देणाऱ्या संबंधित गटविकास अधिकाऱ्यांविरुध्द कारवाई करण्यास ग्रामविकास विभागास कळविण्यात आले आहे.
- हद्दवाढीमुळे समाविष्ट झालेल्या ग्रामपंचायतीमधील, समावेशनास पात्र कर्मचाऱ्यांच्या समावेशनास, आकृतिबंधाच्या अधिन मान्यता देण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात “गेम किंग इंडिया” या नावाने ऑनलाईन सट्टा सुरु असल्याबाबत

**(१५) * ३७६६४ श्री.धनंजय मुंडे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.हेमंत टकले, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मुख्य शहरात “गेम किंग इंडिया” या नावाने कोणतीही परवानगी न घेता ऑनलाईन सट्टा चालवून शासनाची व नागरिकांची दररोज कोट्यवधीची फसवणूक करण्यात येत असल्याची बाब नुकतीच निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हा सर्व प्रकार पोलीस यंत्रणेला तसेच सायबर शाखेला पूर्णपणे माहिती असून सुध्दा त्यांच्याकडून कोणतीही कारवाई करण्यात येत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त सट्टा चालवणारा चौरसिया हा व्यक्ती जनतेची लुट करीत असल्याने त्यास अटक करुन त्याची सक्षम यंत्रणेमार्फत चौकशी करण्याबाबत व बेकायदेशीरपणे सुरु असलेल्या ऑनलाईन सट्ट्यास मदत करणाऱ्या पोलीस यंत्रणेविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) राज्यात मुंबई वगळता इतर शहरात गेम किंग इंडिया या नावाने कोणतीही परवानगी न घेता ऑनलाईन सट्टा चालवून शासनाची व नागरिकांची दररोज कोट्यवधीची फसवणूक करण्यात येत असल्याची बाब उघडकीस आलेली नाही. तथापि, गेम किंग इंडिया या नावाने ऑनलाईन सट्टयाबाबत बृहन्मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रातील विविध पोलीस ठाण्यांमध्ये एकूण ०४ गुन्हे नोंदविण्यात आलेले आहेत.

(२) हे खरे नाही.

(३) यासंदर्भात जे. जे. मार्ग पोलीस ठाणे व नागपाडा पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला असून, अचल चौरसिया हा सदर गुन्हयातील एक आरोपी असून त्याचा शोध घेऊन अटक करुन कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील अशासकीय आयटीआय संस्थांना अनुदान देण्याबाबत

**(१६) * ३८१७२ श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.दत्तात्रय सावंत, डॉ.सुधीर तांबे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.बाळाराम पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक ३७१२० ला दिनांक २० डिसेंबर, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सन २००१ पूर्वी मान्यता दिलेल्या अशासकीय आयटीआय संस्थांना अनुदान देण्याबाबत शासनाने निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने घेतलेल्या निर्णयाचे स्वरुप काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संभाजी पाटील-निलंगेकर :** (१) नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सार्वजनिक वितरण प्रणालीचा गहू काळ्या बाजारात विक्रीला जात असताना पकडल्याबाबत

**(१७) * ३९११३ श्री.परिणय फुके, श्री.धनंजय मुंडे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.हेमंत टकले, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सार्वजनिक वितरण प्रणालीचा २० टन गहू ट्रकने काळ्या बाजारात विक्रीसाठी नेला जात असताना तो ट्रक लव्हाळा फाटा सिंदखेडराजा (जि.बुलढाणा) येथे मेहकर, गुन्हे शाखा व महसूल विभागाच्या पथकाने दिनांक १४ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास पकडला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी प्रथम चार आरोपींवर गुन्हे दाखल करण्यात येऊन तपासामध्ये आरोपीच्या मोबाईल कॉलडेटानुसार अकोला येथील स्वस्त धान्य दुकानदार आसीफ खान यांना चौकशीसाठी दिनांक २७ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास मेहकर, उपविभागीय पोलीस अधिकारी यांनी ताब्यात घेतले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आसीफ खान यांच्या चौकशीवरुन आणखी दोन आरोपीविरुध्द गुन्हे दाखल करुन त्यांचा पोलीस रिमांड घेण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणाचे जाळे इतर राज्यात पसरलेले असल्याची शक्यता असल्याने याप्रकरणाची चौकशी करुन धान्य माफीयांची मोठी टोळी पकडणे आवश्यक असताना आसिफ खान यांचेवर अशा प्रकारचे गुन्हे दाखल असताना सुध्दा मेहकर, उपविभागीय पोलीस अधिकारी यांनी कोणतीही कारवाई न करणे याची दखल घेवून सदर प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**देवेंद्र फडणवीस :** (१) मिळालेल्या खबरीनुसार दिनांक १४ सप्टेंबर, २०१७ रोजी लव्हाळा फाटा येथे नाकाबंदी केली असता एका ट्रकमधील १९,४९० किलो गहू काळया बाजारात विक्रीकरीता नेत असतांना चार आरोपींसह पकडण्यात आला.

(२) उपरोक्त प्रकरणी साखरखेर्डा पोलीस स्टेशन येथे अप. क्रमांक २१२/२०१७, भा.दं.वि. कलम १२०(ब), ४६८, ४६९, ४७१, ३४ व कलम ३, ७ व ८, जीवनावश्यक वस्तु कायदाप्रमाणे चार आरोपींविरुध्द गुन्हा दाखल केला आहे.

चौकशीकरीता आसीफखान यांना बोलाविण्यात आले होते. परंतु नमूद गुन्हयात आसीफखान यांचा सहभाग असल्याची कोणतीही माहिती प्राप्त झाली नाही.

(३) हे खरे नाही. गुन्हयात पुर्वी अटक असलेल्या आरोपींची चौकशी करुन इतर तीन आरोपी निष्पन्न करुन त्यांना अटक करण्यात आली आहे. सदर तीन व उपरोक्त चार असे सर्व सातही आरोपी सध्या जामिनावर आहेत.

(४) आसीफखान यांचा सदर गुन्हयात सहभाग आढळून न आल्याने तसेच त्यांचेविरुध्द अद्याप ठोस पुरावा मिळून न आल्याने त्यांचेविरुध्द सदर गुन्हयामध्ये कार्यवाही करण्यात आली नाही.

गुन्हयाचा पुढील तपास सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## महाराष्ट्र-कर्नाटक सीमा प्रश्न सोडविण्याबाबत

**(१८) * ३७८२० ॲड.अनिल परब : तारांकित प्रश्न क्रमांक ३०९९२ ला दिनांक २६ जुलै, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र-कर्नाटक सीमा प्रश्नासंदर्भात राज्य शासनाने नियुक्त केलेल्या उच्चाधिकार समितीची बैठक गेल्या २ वर्षात झालेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त सीमा प्रश्न सोडविण्यासाठी शासनाने गेल्या दोन वर्षात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

(२) महाराष्ट्र-कर्नाटक सीमा प्रश्न सोडविण्यासाठी गठित केलेल्या उच्चाधिकार समितीची दिनांक ७ जुलै, २०१६ रोजी सहयाद्री अतिथीगृह, मुंबई येथे महत्वपूर्ण बैठक संपन्न झाली आहे. सदर बैठकीत मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या दावा क्र. ४/२००४ च्या संदर्भात घेतलेल्या निर्णयानुसार **(अ)** विशेष समुपदेशी श्री.विनोद बोबडे यांच्या निधनामुळे त्यांच्या जागी दिनांक ०७/०७/२०१६ च्या आदेशान्वये **ॲड.अरविंद दातार** यांची **"विशेष समुपदेशी"** म्हणून नियुक्ती करण्यात आली. **(ब)** नवी दिल्ली येथील विशेष कक्षातील सीमाप्रश्नासंबंधीचे कामकाजासाठी व शासनाशी योग्य तो समन्वय राखण्यासाठी दिनांक ०८/०७/२०१६ च्या आदेशान्वये **सचिव तथा आयुक्त (गुंतवणूक व राजशिष्टाचार), महाराष्ट्र सदन, नवी दिल्ली** यांची **"वरिष्ठ समन्वयक"** म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच **(क)** सदर दाव्यामध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाने स्थापन केलेल्या मा.कोर्ट कमिशनरपुढे साक्षी पुरावे सादर करण्यासाठी तज्ज्ञ साक्षीदारांची प्रतिज्ञापत्रे तयार करण्याच्या अनुषंगाने केलेल्या सर्वेक्षणाकरिता, मध्यवर्ती महाराष्ट्र एकीकरण समितीने अदा केलेल्या रक्कमेची प्रतिपूर्ती दिनांक २७ मार्च, २०१७ च्या शासन ज्ञापनान्वये करण्यात आली आहे.

मा.कोर्ट कमिशनरपुढे साक्षी पुरावे सादर करण्यासाठी नियुक्त केलेल्या तज्ञ साक्षीदारांची प्रतिज्ञापत्रे तयार करण्याकरिता वकील महोदयांच्या नियमित बैठका होत असून प्रतिज्ञापत्रे तयार करण्याचे कामकाज अंतिम टप्प्यात आले आहे.

दाव्याच्या अनुषंगाने कामकाज व मार्गदर्शन करण्यासाठी **मा.डॉ.(प्रा.) एन.डी.पाटील यांच्या अध्यक्षतेखालील तज्ञ समितीच्या** आवश्यकतेनुसार **मुंबई, पुणे व कोल्हापूर** येथे बैठका आयोजित करण्यात येतात. त्यानुसार **दिनांक २७/१०/२०१६ व दिनांक २९/०६/२०१७** रोजी **मा.मुख्य सचिव यांच्या दालनात झालेल्या तज्ञ समितीच्या बैठकीत ठरल्यानुसार** मा.पंतप्रधान यांना दिनांक २९ जुलै, २०१७ च्या पत्रान्वये, गृह मंत्रालय, केंद्र सरकार यांनी मा.सर्वोच्च न्यायालयात सुनावणी वेळी नि:पक्ष भूमिका घेण्याबाबत निर्देश द्यावेत अशी विनंती केली आहे. तसेच यासंदर्भात मा.समन्वयक मंत्री, सीमा प्रश्न यांनी केंद्र शासनाचे कायदा मंत्री यांची **दिनांक २६ सप्टेंबर, २०१७** रोजी नवी दिल्ली येथे भेट घेऊन त्यांना सुध्दा विनंती केली आहे.

**दिनांक २३/०१/२०१७** रोजी मा.सर्वोच्च न्यायालयाच्या त्रिसदस्यीय पीठासमोर **अंतरिम अर्ज क्र. I.A.११, १२ व १३/२०१४ व I.A.१४/२०१५** वर सुनावणी झाली. त्यावेळी **मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक १२/०९/२०१४ रोजी पारीत केलेल्या आदेशात सुधारणा करण्याबाबत** कर्नाटक शासनाने दाखल केलेल्या **इंटरलोकुटरी अर्ज क्र. I.A.१२/२०१४** वरील सुनावणीमध्ये, मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक १३/१२/२०१२ रोजीच्या आदेशाने निश्चित केलेल्या **वादाच्या मुद्यांतील मुद्दा क्र. १ नुसार** मूळ दाव्यामधील, कर्नाटक शासनाने उपस्थित केलेल्या दाव्याच्या वैधतेबाबतच्या मुद्याच्या अनुषंगाने वादी व प्रतिवादी यांनी पुढील सुनावणीपूर्वी आपले म्हणणे मांडावे, तसेच यासंदर्भातील **पुढील सुनावणी दिनांक १० मार्च, २०१७ रोजी** ठेवण्यात यावी, असे मा.सर्वोच्च न्यायालयाने आदेश दिले आहेत. तथापि, **दिनांक १० मार्च, २०१७** रोजीची व त्यानंतर **दिनांक ३१/०७/२०१७** रोजी ठेवण्यात आलेली सुनावणी यादीमधून वगळण्यात येऊन सदर सुनावणी **दिनांक १०/१०/२०१७** ठेवण्यात आली होती. तथापि, याबाबत मा.सर्वोच्च न्यायालयाचे घटनात्मक खंडपीठ

गठित न झाल्याने सुनावणी होवु शकली नाही. महाराष्ट्र शासनाने इंटरलोकुटरी अर्ज क्र. **I.A.१२/२०१४** च्या अनुषंगाने **आपले म्हणणे मा.सर्वोच्च न्यायालयात दिनांक ९/१०/२०१७ रोजी दाखल** केले आहे. **पुढील सुनावणीची तारीख निश्चित झालेली नाही.**

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पंढरपूर (जि.सोलापूर) येथील पंढरपूर अर्बन बँक ते अंबाबाई पटांगण रस्त्याचे काम संथगतीने सुरु असल्याबाबत

**(१९) * ३८४१५ श्री.रामहरी रुपनवर, आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.आनंदराव पाटील, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.मोहनराव कदम, श्री.सुभाष झांबड, प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंढरपूर (जि.सोलापूर) येथील पंढरपूर अर्बन बँक ते अंबाबाई पटांगण रस्त्याचे काम संथगतीने सुरु असल्याने या भागातील संपूर्ण वाहतुक व्यवस्था विस्कळीत झाली असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अंबाबाई पटांगण बसथांबा येथे रस्ता खोदल्यामुळे पाण्याची पाईपलाईन, लोकांचे नळजोड स्थलांतरण, ड्रेनेज पाईपलाईन दुरुस्ती ही कामे प्रलंबित असून उक्त रस्ता ४ महिन्यात पूर्ण करु असा दावा संबंधित नगरपालिका प्रशासनाने केला होता, मात्र २५ टक्के ही काम पूर्ण झाले नसल्याने नागरिकांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार उपरोक्त रस्त्याचे काम तात्काळ पूर्ण करण्याच्यादृष्टीने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) व (२)

- महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाभियानांतर्गत रुपये ५२.६८ कोटी किंमतीची पंढरपूर शहर रस्ते विकास योजना शासनाने मंजूर केली आहे.
- सदर योजनेंतर्गत शहरातील एकूण ८ रस्त्यांचा समावेश आहे.
- त्यापैकी अर्बन बँक ते भीमानदी या ६६० मी. लांब रस्त्यावर पंढरपूर अर्बन बँक ते अंबाबाई पटांगण या रस्त्याच्या भागाचा समावेश आहे.
- सदर योजनेचे काम प्रगतीपथावर आहे.
- या भागातील वाहतुक व भविष्यातील अपघात होण्याची शक्यता विचारात घेता या भागातील संपूर्ण वाहतुक जिल्हा पोलीस प्रमुख यांच्या आदेशानुसार बंद करण्यात आली आहे, हे खरे आहे.
- सदरचे काम जून, २०१८ अखेर पूर्ण करण्याचे पंढरपूर नगरपरिषदेचे नियोजन आहे.

(३) व (४) शासनस्तरावरून सदर प्रकल्पाचा वेळोवेळी आढावा घेण्यात येत असून प्रकल्पातील सर्व कामे जून, २०१८ पर्यंत पूर्ण करणेबाबत सूचना पंढरपूर नगरपरिषदेस देण्यात आल्या आहेत.

-----------------

## पुणे शहरातील इमारतीच्या बांधकामांना परवानगी देण्याचे अधिकाराबाबत

**(२०) * ३७९७५ डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील वीस हजार चौरस फुटांपर्यंतच्या जागेवरील इमारतीच्या बांधकामांना परवानगी देण्याचे अधिकार परवानाधारक आर्किटेक्ट (वास्तुविशारद) आणि अभियंत्यांना देण्याचा महत्वपूर्ण निर्णय महानगरपालिकेने माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निर्णय महानगरपालिकेने वास्तुविशारदांच्या संघटनांशी कोणतीही चर्चा न करता घेतल्याने वास्तुविशारदांमध्ये असंतोष निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) जोखिम आधारित इमारत परवानगीच्या धर्तीवर परवानाधारक इंजिनिअर/आर्किटेक्ट यांच्या स्वयं घोषणापत्रानुसार ट्रस्ट अॅण्ड व्हेरिफाय या धोरणावर बांधकाम परवानगी देण्याचा निर्णय पुणे महानगरपालिकेमार्फत जानेवारी, २०१८ मध्ये घेण्यात आलेला आहे.
(२) सदरहू निर्णय हा प्रशासकीय स्वरूपाचा असून त्याची अंमलबजावणी सुरू करण्यात आलेली आहे. वास्तुविशारद संघटना, महाराष्ट्र चॅप्टर यांनी स्वयंघोषणापत्राच्या नमुन्याबाबत काही मुद्दे उपस्थित केलेले आहेत.
(३) सदर प्रकरणी पुणे महानगरपालिकेकडे कार्यवाही सुरु आहे. पुणे महानगरपालिकेने बांधकाम परवानगी कार्यप्रणालींतर्गत सुचविलेल्या हमी पत्रातील काही बाबींबाबत वास्तुविशारद संघटनेने बदल सुचविलेले आहेत. सदर बदलांबाबत कायदेशीर बाबींच्या अनुषंगाने पडताळणी करून आवश्यक तो निर्णय पुणे मनपास्तरावर घेण्यात येणार आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील करीरोड येथे एका खाजगी विकासकाने अवैधपणे खोदकाम केल्याबाबत

**(२१) * ३९०१६ श्री.हेमंत टकले, अॅड.जयदेव गायकवाड, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.आनंद ठाकूर, अॅड.राहुल नार्वेकर, श्री.सुनिल तटकरे, श्री.विक्रम काळे, श्री.ख्वाजा बेग, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.रामराव वडकुते, अॅड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील करीरोड येथील स.बा.पवार मार्गावर एका खाजगी विकासकाने नवीन इमारतीच्या खोदकामाचे अवैध काम केल्यामुळे या परिसरातील म्हाडाच्या इमारतींना तडे जावून त्या इमारती धोकादायक झाल्याची बाब माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या धोकादायक स्थितीबाबत म्हाडा इमारतीतील रहिवाश्यांनी म्हाडा कार्यालयाला निवेदने देऊनही या गंभीर बाबीकडे म्हाडातील अधिकाऱ्यानी दुर्लक्ष करुन विकासकाच्या हिताच्या बाबी करीत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार उक्त प्रकरणी तडे गेलेल्या इमारतीबाबत योग्य निर्णय घेवून विकासकाच्या हिताच्या बाबी करणाऱ्या म्हाडा अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश महेता :** (१) करीरोड येथील स.बा. पवार मार्गावरील १७३ बीसीडी लम्ब बिल्डींग या उपकरप्राप्त इमारतीच्या पुनर्विकासासाठी विकास नियंत्रण नियमावली ३३(७) अंतर्गत ना-हरकत प्रमाणपत्र मे.चिंतामणी कन्स्ट्रक्शन कं. या विकासकास देण्यात आलेले असून, त्याअंतर्गत महानगरपालिकेच्या मंजूरीनुसार इमारतीचे काम सुरु आहे. सदर इमारतीच्या शेजारील आंबेडकर सदन या इमारतीतील रहिवाशांनी इमारतीस तडे जाऊन ती धोकादायक झाल्याबाबत दिनांक १२/१२/२०१७ रोजीच्या पत्रान्वये म्हाडास कळविण्यात आले होते. त्यानुसार दिनांक १३/१२/२०१७ रोजी स्थानिक रहिवाश्यांसोबत मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या अधिकाऱ्यांनी केलेल्या प्राथमिक पाहणीत इमारत धोकादायक नसल्याचे निदर्शनास आले.
(२) हे खरे नाही.

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या अधिकाऱ्यांनी दिनांक १३/१२/२०१७ रोजी स्थानिक रहिवाशांसोबत इमारतीची प्राथमिक पाहणीत दाखविण्यात आलेले तडे हे सेप्रेशन क्रॅक असल्याने धोका उद्भवत नसल्याचे रहिवाशांना समजावून सांगितले. तसेच दिनांक २१/१२/२०१७ रोजी

वास्तुविशारदांनी स्थानिक रहिवाशी व मंडळाचे अधिकारी यांच्या उपस्थितीत इमारतीची पाहणी करून वास्तुविशारदांनी दिलेल्या अभिप्रायानुसार इमारतीच्या तडे असलेल्या भागाची योग्य ती दुरुस्ती करण्यात आलेली आहे.
(३) याबाबत सदरची बाब मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्यास्तरावर हाताळण्यात आली असल्याने या प्रकरणी शासनातर्फे कोणतीही चौकशी करण्यात आलेली नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे शहरात स्पा-सलूनच्या नावे वेश्याव्यवसाय सुरु असल्याबाबत

**(२२) * ३८७७२ श्री.अनिल भोसले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे शहरातील स्वारगेट जवळील मुकुंदनगर येथील औरा थाई स्पा ॲण्ड सलून येथे वेश्या व्यवसाय सुरु असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त शहरातील पंचतारांकित हॉटेल, मॉलमधील स्पा सेंटर तसेच कोरेगाव पार्क, कल्याणीनगर व इतर उच्चभ्रू सोसायट्यांमध्येही अशाप्रकारे हायप्रोफाईल वेश्या व्यवसाय सुरु असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार उक्त शहरात सुरु असलेला हायप्रोफाईल वेश्या व्यवसाय रोखण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

फिर्यादीने दिलेल्या तक्रारीवरून स्वार गेट पोलीस स्टेशन येथे गुरनं ०६/१८ अनैतिक व्यापार प्रतिबंधक अधिनियम ३, ४, ५ व ७ सह भा.दं.वि. कलम ३७०, ३७०अ, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यात दोन आरोपीना अटक करण्यात आली आहे.

(२) व (३) पुणे शहरातील कोरेगांव पार्क व कल्याणीनगर व इतर भागात वेश्याव्यवसायासंदर्भात सन २०१७ मध्ये ९ गुन्हे व सन २०१८ जानेवारी अखेर २ गुन्हे दाखल आहेत.

वेश्या व्यवसाय रोखण्यासाठी खालील प्रमाणे उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत.

१. मसाज पार्लर, पंचतारांकित हॅाटेल तसेच उच्चभ्रु सोसायट्यामध्ये चालू असलेल्या वेश्याव्यवसाय संदर्भाने कर्मचारी तसेच गोपनीय बातमीदारामार्फत माहिती काढुन संबंधित ठिकाणी तात्काळ छापा टाकुन कारवाई करून, पिडीत मुलीची सुटका करण्यात येते, तसेच आरोपींचेविरूध्द कायदेशीर कारवाई करण्यात येते.

२. ज्या ठिकाणी जबर दस्तीने वेश्याव्यवसाय चालु होता ते ठिकाण निष्पन्न झाल्याने तेथील कुंटनखान्यामध्ये भविष्यात अशा प्रकारचे वेश्या व्यवसाय चालु नयेत व त्यास आळा बसावा या उद्देशाने सदर कुंटनखाने सील करण्यात येतात. सन २०१७-२०१८ मध्ये एकूण २९ कुंटणखाने सिल केले आहेत.

३. पुणे शहर तसेच ग्रामीण हद्दीमध्ये लॉजेसमध्ये वेश्या व्यवसाय चालत असलेची माहिती मिळाल्यास संबंधित ठिकाणी छापा टाकुन कारवाई करण्यात येते. लॉज मालक व एजंट यांचेविरूध्द अ.न्या.प्र. अधिनियम अंतर्गत गुन्हे दाखल करण्यात येत आहेत.

४. अनैतिक मानवी वाहतुकीस प्रतिबंध करण्यासाठी पुणे शहरातील एन.जी.ओ. यांच्या बैठका घेवुन त्यांना उपाययोजनेची माहिती देवुन काही सूचना असल्यास त्याची माहिती घेवुन त्या आधारे कार्यवाही करण्यात येत आहेत.

५. गरजु मुली व महिलांच्या गरीब परिस्थितीचा फायदा घेवुन त्यांना पैशाचे अमिष दाखवुन हाय प्रोफाईल वेश्याव्यवसाय करणेस भाग पाडणारी टोळी असल्याचे पुणे शहरात दाखल झालेल्या गुन्ह्यांचा अभ्यास करून अशा प्रकारचे संघटीतपणे गुन्हेगारी करणारे एकूण २४ आरोपीचेविरुध्द मोकांतर्गत कारवाई करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील अँटॉप हिल येथील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेत झालेल्या गैरप्रकाराबाबत

**(२३) * ३८३६१ ॲड.राहुल नार्वेकर, श्री.हेमंत टकले, श्री.ख्वाजा बेग, श्री.आनंद ठाकूर, श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील अँटॉप हिल येथे चांदणी आगार रहिवाशी संघाचे शिव प्रेरणा सहकारी गृहनिर्माण संस्था (नियोजित) या नावाने राबविण्यात आलेल्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेत ९३५ पैकी २६ झोपडपट्टीधारकांनी सन १९९५ पुर्वीचे बनावट विद्युत देयके सादर करुन परिशिष्ट-२ मध्ये आपली झोपडी पात्र करुन घेतल्याची बाब माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपजिल्हाधिकारी (अतिनिष्कासन) धारावी विभाग यांच्याकडूनही मान्यता देण्यात आलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तदनुसार दोषी असलेल्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश महेता :** (१), (२) व (३) अँटॉप हिल, मुंबई येथील चांदणी आगार रहिवाशी संघाच्या शिव प्रेरणा सहकारी गृहनिर्माण संस्थेतील २६ झोपडीधारकांच्या पात्रतेबाबत ऑक्टोबर, २०१७ मध्ये अपर जिल्हाधिकारी तथा अपिलीय प्राधिकारी, मुंबई शहर यांच्या कार्यालयाकडे तक्रार अर्ज प्राप्त झाला असून, त्याबाबत त्या कार्यालयाकडून फेरपडताळणी सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## म्हाडाच्या कार्यकारी अभियंत्यांनी मनमानी कारभार करून कोट्यवधीची देयके पास केल्याबाबत

**(२४) * ३८७०९ श्री.प्रविण दरेकर, श्री.नागोराव गाणार, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.गिरीशचंद्र व्यास :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चेंबूर येथील वॉर्ड नं. १७२ मधील एसआरएच्या कामात कंत्राटदाराने फक्त १५ टक्के कामाचा आरंभ केला असताना म्हाडा स्लमचे कार्यकारी अभियंता श्री.राहुल वटकर व उपअभियंता श्री.निलेश मेडाम यांनी मनमानी कारभार करुन त्यांची कोटयवधीची देयके पास केल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश महेता :** (१) व (२) मुख्य अधिकारी, मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ, म्हाडा यांच्याकडून प्राप्त अहवालानुसार, सन २०१७-२०१८ या आर्थिक वर्षात वार्ड क्र.१७२ (अणुशक्ती नगर) मतदार संघासाठी जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांचेकडून विविध लेखाशिर्षाखाली एकूण रुपये ५८५.०० लक्ष निधीच्या ६० कामांसाठी म्हाडाची प्रशासकीय मंजूरी मिळाली असून त्यापैकी रुपये ८२.०० लक्षांच्या २० कामांसाठी कार्यादेश देण्यात आलेले आहेत. सदरची कामे प्रगतीपथावर असल्याने सदर कामांसाठी देयके अदा करण्यात आलेली नाहीत. तसेच, सन २०१७-२०१८ या आर्थिक वर्षात मंजूर झालेल्या कोणत्याही कामांसाठी देयके अदा करण्यात आलेली नाहीत. या पुर्वीच्या आर्थिक वर्षात मंजूर झालेली कामे पूर्ण झाल्यानंतर देयके मंजूर करण्यात आली आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## औरंगाबाद महानगरपालिकेतील गैरव्यवहार केलेल्या अधिकाऱ्यावर कारवाई करण्याबाबत

**(२५) * ३८५६८ श्री.सुभाष झांबड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औरंगाबाद महानगरपालिकेत नगररचना विभागाशी संबंधित अधिकाऱ्याने कार्यक्षेत्राबाहेर जाऊन बांधकाम संचिका मंजूर करून जास्तीचा एफएसआय देऊन मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार केल्याप्रकरणी तत्कालीन आयुक्त यांनी सन २००९ मध्ये वा त्यादरम्यान चौकशीचे आदेश दिले असतानाही अद्याप चौकशी करण्यात आली नसल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू दोषी अधिकाऱ्यांची शासनाने चौकशी करुन त्यांच्यावर कारवाई करण्याबाबत तसेच सदरहू अधिकाऱ्याची चौकशी करण्यास दिरंगाई करणाऱ्या संबधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) औरंगाबाद महानगरपालिकेतील शाखा अभियंता, नगररचना विभाग, यांनी इमारत बांधकामास परवानगी देण्यापूर्वी नियमानुसार प्रस्तावाची छाननी न केल्याबाबत त्यांच्याविरुध्द सन २००९ मध्ये विभागीय चौकशी आदेशीत केली होती.

चौकशी अधिकाऱ्याची बदली झाल्याने अन्य चौकशी अधिकाऱ्याची सन २०११ मध्ये नियुक्ती करण्यात आली आहे.

चौकशी अधिकाऱ्यानी अद्याप पर्यंत चौकशी अहवाल सादर केलेला नाही. याबाबत सदर चौकशी अधिकाऱ्याला समज देण्यात आली असून, त्यांच्याकडून पुढील ३ महिन्यात चौकशी पूर्ण करुन चौकशी अहवाल प्राप्त करुन घेण्यात येईल असे महानगरपालिकेने कळविले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कांदिवली (मुंबई) येथील माजी नगरसेवकाची हत्या झाल्याच्या घटनेबाबत

**(२६) * ३९०८० श्री.जनार्दन चांदूरकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील कांदिवली येथील माजी नगरसेवक अशोक सावंत यांची निघृण हत्या केल्याची घटना दिनांक ८ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास घडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील घटनेची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार याप्रकरणील आरोपींना अटक करुन त्यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

परंतु, सदरची घटना दिनांक ०७/०१/२०१८ रोजी पुर्व वैमनस्यातुन झाल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.

(२) होय.

सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली असून समतानगर पोलीस स्टेशन येथे गु.र.क्र. २०/२०१८ भा.दं.वि. कलम ३०२, ३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर गुन्ह्यात अद्यापपर्यंत ५ आरोपींना अटक करण्यात आली असून १ विधी संघर्षग्रस्त बालकास ताब्यात घेण्यात आले आहे. तसेच, नमूद गुन्ह्याच्या तपासामध्ये भा.दं.वि. कलम १२०(ब), २१६ अशी वाढ करण्यात आली आहे. सदर गुन्ह्यातील पाहिजे २ आरोपींना अटक करणे बाकी असून नमूद गुन्हा तपासाधीन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## श्री.चंपकलाल अमिचंद शहा यांची मालमत्ता हडप केल्याबाबत

**(२७) * ३९०२९ श्री.रविंद्र फाटक :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील शहापूर, मुरबाड, भिवंडी आणि नाशिक जिल्ह्यातील इगतपूरी, खेड, काननवाडी व इतर ठिकाणच्या श्री.चंपकलाल अमिचंद शहा व इतर ४१ शहा कुटुंबियांची शेकडो एकर जमिनी, ५०० तोळे हून अधिक सोने व ५० किलो हून अधिक चांदीचे वस्तू/भांडी/कुंडी, जडजवाहिर व इतर मालमत्ता हडप केल्याप्रकरणी मुरबाड पोलीस ठाण्यामध्ये श्री.नथमल रेखचंद संचेती व खेतीया यांचेविरुध्द दिनांक १७ मे, २०१६ रोजी वा त्यासुमारास गुन्हा कमांक आय-७८ नोंदवून दिड वर्षाचा कालावधी झाला असूनही मुख्य आरोपीस अजुनही अटक करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणातील आरोपीनी श्रीमती चंदनबाई नगीनदास शहा यांचे अपहरण व खून करुन मृत्यूपूर्वीच बनावट मृत्यूपत्राच्या आधारे महसूल अधिकाऱ्यांची दिशाभूल करुन जमिनीची अफरातफर केल्याबाबत शहा परिवाराने दिनांक ५ सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री यांना निवेदन सादर करुनही सदर निवेदनाच्या अनुषंगाने मा.मुख्यमंत्री यांच्या आदेशानंतर आर्थिक गुन्हे शाखेमार्फत गुन्हा नोंदविल्यानंतर उपरोक्त प्रकरणी तपास होणे गरजेचे असतानाही याबाबत कोणतीही कार्यवाही झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शेकडो एकर जमिनी हडप केल्याप्रकरणी तसेच श्रीमती चंदनबाई नगीनदास शहा यांचे अपहरण करुन योजनाबध्द खून केल्याप्रकरणी सीआयडीमार्फत चौकशी करण्याबाबत काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) हे खरे नाही.

सदर गुन्ह्यामध्ये ठाणे ग्रामीण जिल्ह्यातील मुरबाड पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. ७८/२०१६ भा.दं.वि. कलम ४०६, ४०८, ४६५, ४६७, ४७१ सह नोंदणी कायदा कलम ३७७ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून आरोपी

नथमल रेखचंद संचेती यास दिनांक २३/१०/२०१६ रोजी अटक करण्यात येवून १२ दिवस पोलीस कस्टडी देण्यात आली होती. सद्य:स्थितीत आरोपी जामिनावर असून गुन्हा तपासाधिन आहे.

(३) प्रस्तुत प्रकरणी सी.आय.डी. चौकशीच्या विनंती संदर्भात स्वतंत्रपणे कार्यवाही सुरू आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मालेगाव (जि.नाशिक) महानगरपालिका हद्दीतील नैसर्गिक नाला बुजविण्यात आल्याबाबत

**(२८) * ३९४१९ डॉ.अपूर्व हिरे : दिनांक १४ डिसेंबर, २०१७ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक २ मधील प्रश्न क्रमांक २७९९८ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालेगाव (जि.नाशिक) शहरातील श्री.गोशाळा पांजरापोळ संस्था व म्युन्सिपल हायस्कुलचे भिंती लगत असलेला नैसर्गिक नाला बुजवून त्यावर बेकायदेशीर होणाऱ्या अतिक्रमणाबद्दल वारंवार तक्रारी करूनही महसूल व पोलीस प्रशासनाने दुर्लक्ष केल्याने तेथे जवळपास ४० अनधिकृत गाळे उभारण्यात आले असून सदरील बेकायदेशीर काम थांबविणेबाबत श्री.गोशाळा संस्थेचे पदाधिकारी यांनी शासनाकडे मागणी केली असून स्थानिक लोकप्रतिनिधींनीही दिनांक १५ मार्च, २०१७ रोजीच्या पत्रान्वये मा.मुख्यमंत्री, मा.पालकमंत्री जिल्हा नाशिक यांना सदरील अतिक्रमण निष्कासित करणेबाबत विनंती केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील नैसर्गिक नाला बुजविण्यात आल्याने पावसाळ्यात पावसाच्या पाण्याचे नैसर्गिक वहन बंद पडून गोशाळा आवारात व अन्य परिसरात पूर स्थिती उद्‌भवण्याचा धोका असूनही महानगरपालिका व पोलीस प्रशासनाकडून यासंदर्भात कोणतीही कारवाई करण्यात आली नाही अशी गोशाळा व्यवस्थापनाची तक्रार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संबंधित संस्थेच्या विनंती वरून या बेकायदेशीर कामास मा.मुख्यमंत्री महोदयांनी दिनांक २३ एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास स्थगिती दिली व यासंदर्भातील सविस्तर अहवाल मागविण्याचे आदेश नगरविकास विभागास दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मालेगाव महानगरपालिका हद्दीतील श्री.गोशाळा पांजरापोळ या संस्थेच्या पुर्व दिशेला शासकीय जागेवर असलेला नैसर्गिक नाला बुजविण्यात येत असल्याबाबत संस्थेने उपविभागीय अधिकारी, मालेगांव यांचेकडे दाखल केलेल्या दाव्याप्रकरणी उपविभागीय अधिकारी, मालेगांव यांनी दिनांक १३ जून, २०१७ रोजी आदेश पारित करून सदर नाला बुजविण्याचे काम तात्काळ बंद करून नाला पुर्ववत करण्याचे निर्देश सदर महानगरपालिकेस देण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून उक्त नाल्यावरील अतिक्रमणे निष्कासित करून बंद नाला पुर्ववत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) मालेगाव शहरातील श्री.गोशाळा पांजरापोळ संस्थेच्या मागील बाजुस म्युन्सिपल हायस्कुलच्या भिंतीलगत असलेल्या नैसर्गिक नाल्याची रुंदी ७० फुट असून त्यापैकी ३० फुट भागावर भर टाकून त्यावर एकूण ३७ अतिक्रमणे झालेली आहेत, ही वस्तुस्थिती आहे.

सदर अतिक्रमणे काढण्याबाबत श्री.गोशाळा पांजरापोळ संस्थेने तसेच मा.लोकप्रतिनिधींनी विनंती केलेली आहे.

(२), (३), (४) व (५) नैसर्गिक नाला बुजवुन त्याचा प्रवाह रोखणे ही कृती अवैध ठरत असल्याने, अशा प्रकारचे काम थांबविण्याबाबत महानगरपालिकेस दिनांक २६/०४/२०१७ रोजी शासनस्तरावरुन निर्देश देण्यात आले.

या अनुषंगाने महानगरपालिकेने सर्व संबंधित ३७ अतिक्रमणधारकांना अतिक्रमण काढून घेण्याबाबत दिनांक ०२/०५/२०१७ रोजी नोटीसा दिल्या आहेत.

सदर नोटिशीविरोधात संबंधित अतिक्रमणधारकांनी दिनांक ०८/०५/२०१७ रोजी दिवाणी न्यायालयात रे.मु.नं.११२/२०१७ अन्वये दावा दाखल केला आहे.

यासंदर्भात श्रीगोशाळा पांजरापोळ या संस्थेने उपविभागीय अधिकारी, मालेगाव यांच्याकडे दाखल केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने, उपविभागीय अधिकारी, मालेगाव यांनी दिनांक १३/०६/२०१७ रोजी, श्री.गोशाळा पांजरापोळ संस्थेच्या पूर्व दिशेला शासकीय जागेवर असलेला नैसर्गिक नाला बुजविण्याचे काम तात्काळ बंद करुन नाला पूर्ववत करण्याचे महानगरपालिकेस निर्देश दिले आहेत.

प्रस्तुत प्रकरणी शासनाने दिलेले निर्देश, तसेच उपविभागीय अधिकारी, मालेगाव यांचे आदेश विचारात घेऊन, नैसर्गिक नाल्यावरील अतिक्रमण तात्काळ हटवून नाला पुर्ववत करण्याबाबत महानगरपालिकेस सूचित करण्यात आले आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## गोरेगांव-मालाड लिंकरोड (मुंबई) येथील बारमध्ये अल्पवयीन मुला-मुलींचे शारीरिक शोषण होत असल्याबाबत

**(२९) * ३९५७७ श्री.सुनिल तटकरे, अॅड.जयदेव गायकवाड, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.ख्वाजा बेग, श्री.रामराव वडकुते, अॅड.निरंजन डावखरे, श्री.हेमंत टकले, श्री.विक्रम काळे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.आनंद ठाकूर, अॅड.राहुल नार्वेकर, श्री.जयवंतराव जाधव :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील गोरेगांव-मालाड लिंकरोडवरील नाईट सिटी बार अॅण्ड रेस्टॉरंट या बारमध्ये ग्राहकांच्या मनोरंजनाच्या नावाखाली अल्पवयीन मुली व मुलांचे शारीरिक शोषण मोठ्या प्रमाणात होत असल्याच्या तक्रारी स्थानिक रहिवाश्यांनी पोलीस स्टेशनला अनेक वेळा केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात फेरीवाला धोरणाची अंमलबजावणी करण्याबाबत

**(३०) * ३९७४० श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.आनंदराव पाटील, डॉ.सुधीर तांबे, श्री.सुभाष झांबड, श्री.अमरनाथ राजूरकर, आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.हरिसिंग राठोड, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.मोहनराव कदम : तारांकित प्रश्न क्रमांक ३४९३४ ला दिनांक १३ डिसेंबर, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात फेरीवाला धोरणाची अंमलबजावणी करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निर्णयाचे स्वरुप काय आहे व तद्नुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) केंद्र शासनाने दिनांक १ मे, २०१४ पासून पथविक्रेता (उपजीविका संरक्षण आणि पथविक्रीचे विनियमन) अधिनियम २०१४ लागू केला आहे.

सदर अधिनियमातील कलम ३६(१) नुसार राज्य शासनाने महाराष्ट्र पथविक्रेता (उपजीविका संरक्षण व पथविक्री विनियमन) (महाराष्ट्र) नियम २०१६, दिनांक ३ ऑगस्ट, २०१६ रोजी नियमावली प्रसिध्द केली असून कलम ३८(१) नुसार दिनांक ९ जानेवारी, २०१७ रोजी पथविक्रेता (उपजीविकेचे संरक्षण व पथविक्री विनियमन) २०१७ योजना प्रसिध्द केली आहे.

उपरोक्त नियम व मा.उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार प्रत्येक स्थानिक स्वराज्य संस्थेमार्फत नगर पथविक्रेता समिती गठीत करण्यात येत आहे.

सदर समितीमार्फत पथविक्रेत्यांचे सर्वेक्षण करणे, पथविक्रीकरीता ठिकाणे/जागा निश्चित करणे, पथविक्री प्रक्षेत्रे निश्चित करुन स्थानिक प्राधिकरणामार्फत फेरीवाला धोरणाची अंमलबजावणी करण्यात येणार आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## चेंबूर येथील सहकार नगरातील चित्रा हाऊसिंग सोसायटीने स्वयं पुनर्विकासाचा घेतलेल्या निर्णयाबाबत

**(३१) * ४०१४७ श्री.नागोराव गाणार, प्रा.अनिल सोले, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत विकासकांच्या धोरणामुळे पुनर्विकास करु इच्छिणाऱ्या गृहनिर्माण सोसायट्यांना नुकसान होत असल्याने चेंबूर येथील सहकार नगरातील चित्रा हाऊसिंग सोसायटीने स्वयं पुनर्विकास करण्याचा पर्याय निवडला असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त सोसायटीने स्वयं पुनर्विकास करण्याचा पर्याय निवडल्यामुळे रहिवाशांना १३०० चौरस फुटांचे घर आणि प्रत्येकी रुपये ३२ लाखांचा कॉर्पस फंड मिळणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकल्पाच्या माध्यमातून सोसायटीतील सदस्यांना मोठी घरे, दर्जेदार काम, अधिक कॉर्पस फंड, मेन्टेन्सच्या फ्री व अतिरिक्त एफएसआयच्या विक्रीतून मिळणारा सर्व नफा गृहनिर्माण सोसायट्यांना मिळणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश महेता :** (१) उपाध्यक्ष, म्हाडा यांचेकडून प्राप्त अहवालानुसार, चेंबूर येथील सहकार नगरातील चित्रा हाऊसिंग सोसायटीने स्वयं पुनर्विकासाचा प्रस्ताव दिनांक ११/१०/२०१७ रोजी सादर केलेला आहे.

(२) सदरहू संस्था म्हाडाच्या ५४८.५० चौ.मी. क्षेत्रावर असल्याने शासनाच्या दिनांक ०८/१०/२०१३ व दिनांक ०३/०७/२०१७ रोजीच्या अधिसूचनेनुसार गृहसाठ्यावर/अधिमुल्यावर आधारीत ३.०० इतके चटईक्षेत्र अनुज्ञेय होईल. त्यानुसार संस्थेकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावावर म्हाडाच्या मुंबई मंडळाकडून पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) व (४) संस्था स्वयं पुनर्विकास करत असल्याने या प्रकल्पातून होणारा नफा संस्थेस प्राप्त होणार असून सदर नफ्याच्या वाटपाबाबत संस्था निर्णय घेईल. संस्थेमार्फतच पुनर्विकास होत असल्याने पुनर्विकासाचा दर्जा उत्तम राखण्याची खातरजमा संस्था स्वत: करु शकेल. तथापि, सदर संस्थेस भाडेपट्टा करारनाम्याद्वारे दिलेल्या जमिनीलगतच्या टिट बिट (फुटकळ) जमिनीच्या वितरणाचा प्रस्ताव म्हाडाने शासनास सादर केला असून शासनस्तरावर पुढील कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नायगाव (मुंबई) येथील पोलीस उपरुग्णालयाची दुरवस्था झाल्याबाबत

**(३२) * ४०६१४ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.आनंदराव पाटील, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.सुभाष झांबड, श्री.अमरनाथ राजूरकर, आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.जनार्दन चांदूरकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नायगाव (मुंबई) येथील पोलीस उपरुग्णालयाची दुरवस्था झाली असून अनेक गैरसोयींचा रूग्णांना त्रास सहन करावा लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू पोलीस उपरुग्णालयाच्या दुरवस्थेबाबत माजी पोलीस उपनिरीक्षक प्रभाकर अनंत भोगले यांनी दिनांक ९ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री, मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री व पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई पोलीस यांचेकडे सविस्तर निवेदन सादर केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू निवेदनाच्या अनुषंगाने शासनामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.
(२) सदर निवेदन पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, मुंबई यांचे कार्यालयास प्राप्त आहे.
(३) व (४) सदर इमारतीची दुरुस्ती करण्यासाठी एकूण रुपये ३९,६६,५७३/- इतक्या खर्चाच्या अंदाजास पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांनी प्रशासकीय मान्यता दिली असून दुरुस्तीचे कामकाज सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत सुरु आहे.

-----------------

## पंढरपूर (जि.सोलापूर) येथे यात्रेकरीता राखीव असलेल्या परिसराच्या सुरक्षिततेबाबत

**(३३) * ४०७०२ प्रा.डॉ.तानाजी सावंत :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पंढरपूर (जि.सोलापूर) येथे यात्रेकरीता राखीव असलेला ६५ एकरच्या परिसरात मद्यपान करणे, जुगार खेळणे व अन्य अवैध प्रकार सुरु असल्याची बाब दिनांक २४ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त परिसराच्या सुरक्षेकरिता सुरक्षा एजन्सीची नेमणूक करण्यासंदर्भातील प्रस्ताव नगरपरिषदेमध्ये प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

(२) सदर परिसर यात्रेकरुंना सोयी-सुविधा व परिसर सुरक्षित रहावा तसेच, उपलब्ध सोयी सुविधामध्ये नासधुस होवु नये यासाठी पंढरपूर नगर परिषदेने प्रायोगिक तत्वावर देखभालीची निविदा दिनांक २७/०२/२०१८ रोजी प्रसिध्द केली आहे. निविदा मंजूरीनंतर सदर जागेमध्ये सुरक्षा रक्षक नेमण्यात येणार आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## स्वातंत्र्य सैनिकांना शासनाचे मिळणारे सेवानिवृत्तीवेतन पूर्ववत सुरु करण्याबाबत

**(३४) * ४०८०५ ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात स्वातंत्र्य सैनिकांना शासनाकडून दरमहा रुपये ८ हजार इतके सेवानिवृत्ती वेतन देण्यात येते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त सेवानिवृत्ती वेतनात शासनाने कपात केली असून अनेक सेवानिवृत्तीधारकांच्या वारसांना उक्त सेवानिवृत्ती वेतन देणे बंद करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, स्वातंत्र्यसैनिक कै. भास्कर पांडुरग आयरे यांच्या पत्नी श्रीमती सुवासिनी भास्कर आयरे यांना शासनाकडून स्वातंत्र्यसैनिक सेवानिवृत्ती वेतन दरमहा रुपये ८ हजार इतके मिळत होते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, त्यांना केंद्र शासनाकडून कोणत्याही प्रकारचे सेवानिवृत्ती वेतन मिळालेले नसतानादेखील तत्कालिन जिल्हाधिकारी यांनी उक्त मिळणाऱ्या सेवानिवृत्ती वेतनात कपात करुन ते रुपये ५००/- इतके करण्यात आल्याने श्रीमती सुवासिनी आयरे ह्या उपोषणास बसल्या असता मा.पालकमंत्री, पालघर जिल्हा यांनी त्यांना सेवानिवृत्ती वेतन पूर्ववत सुरु करण्याबाबत आश्वासित केले होते, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन स्वातंत्र्य सैनिकांचे सेवानिवृत्ती वेतन पूर्ववत सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) अंशत: खरे आहे.

राज्य शासनामार्फत स्वातंत्र्य सैनिक/त्यांची वारस विधवा पत्नी/विधुर पती यांना दरमहा देण्यात येणारे रुपये ८०००/- इतक्या स्वातंत्र्य सैनिक निवृत्तीवेतनामध्ये वाढ करुन दिनांक २/१०/२०१४ पासून दर महा रुपये १०,०००/- इतके निवृत्तीवेतन देण्यात येते.

(२) अंशत: खरे आहे.

केंद्र शासन आणि राज्य शासन या दोन्हींकडून निवृत्तीवेतन घेत असलेल्या राज्यातील स्वातंत्र्य सैनिकांना माहे नोव्हेंबर, २००४ पासून रुपये ५००/- दरमहा इतके निवृत्तीवेतन देण्यात येते. नवीन धोरण शासनाच्या विचाराधीन आहे.

स्वातंत्र्य सैनिकाच्या निधनानंतर त्यांच्या विधवा पत्नीस/विधुर पतीस निवृत्तीवेतन देण्यात येते. तथापि, त्यांच्या मृत्यू पश्चात वारसदारांना कोणत्याही प्रकारे निवृत्ती वेतनाचे लाभ देण्याचे शासनाचे धोरण नाही.

(३) हे खरे नाही. कै.भास्कर पांडुरंग आयरे यांच्या निधनानंतर त्यांची विधवा पत्नी श्रीमती सुहासिनी आयरे यांना रुपये ५००/- दरमहा इतके राज्य शासनाचे निवृत्तीवेतन देण्यात येत होते.

(४) हे खरे आहे.

(५) स्वातंत्र सैनिक विधवा पत्नी श्रीमती. सुहासिनी भास्कर आयरे यांना राज्य शासनाचे निवृत्तीवेतन प्रचलित दराने तसेच थकबाकीसह देण्यास मंजुरी आदेश निर्गमित करण्यात आला आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नांदेड शहरातील शासकीय आयुर्वेदिक महाविद्यालयातील रॅगिंग प्रकरणाबाबत

**(३५) * ४०९०५ श्री.अमरनाथ राजूरकर, प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड शहरातील शासकीय आयुर्वेदिक महाविद्यालयात प्रथम वर्षात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना वरिष्ठ विद्यार्थ्यांनी रात्री वसतिगृहात बोलावून रॅगिंग केल्याची घटना दिनांक २५ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पिडीत विद्यार्थ्यांनी येथील वजिराबाद पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करुनही याप्रकरणी पोलिसांनी कोणतीही कारवाई केली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार दोषी विद्यार्थ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) महाविद्यालयातील बी.ए.एम.एस. व्दितीय वर्षाच्या विद्यार्थाना त्याच महाविद्यालयातील वरिष्ठ विद्यार्थानी रँगिगच्या नावाखाली वसतिगृहातील रूममध्ये बंद करून त्यांच्या तोंडावर सिगारेटचा धूर व धमकी दिल्याची तक्रार दिनांक २४/०१/२०१८ रोजी वजिराबाद पोलीस स्टेशन नांदेड येथे दिलेली आहे.

(२) हे खरे नाही.

पिडीत विदयार्थ्यानी दिलेल्या तक्रारी नुसार वजिराबाद पोलीस स्टेशन नांदेड यांचे अभिलेखावर नोंद घेण्यात आली व पुढील कार्यवाही करणेकरीता अध्यक्ष, ॲन्टी रॅगिंग चौकशी समिती शासकीय आयुर्वेदीक महाविद्यालय नांदेड तथा अधिष्ठाता शासकीय आयुर्वेद महाविद्यालय नांदेड यांचेकडे पाठवून अहवाल सादर करणेबाबत सूचना देण्यात आल्या.

(३) सदरच्या प्रकरणाबाबत अध्यक्ष ॲन्टी रॅगिंग चौकशी समिती तथा अधिष्ठाता शासकीय आयुर्वेद महाविद्यालय नांदेड यांचेमार्फत चौकशी सुरू असताना गैरअर्जदार व अर्जदार यांचेत आपसात तडजोड करुन घेतली.

सदर प्रकरणात चौकशी अंती दोषी असलेल्या ७ विदयार्थ्यांना तीन दिवसाचे आत शासकीय आयुर्वेद महाविद्यालयाच्या वसतिगृहातून निष्कासित करणेबाबत समितीकडून शिफारस करण्यात आली. तसेच, सात विद्यार्थांसह चार विदयार्थ्यी यांना शासकीय आयुर्वेदीक महाविद्यालय नांदेड येथील वसतिगृह परिसरात येण्या जाण्यास प्रतिबंध घालण्यात आला सदर प्रकरणी विद्यार्थ्यांना पालकांचे समक्ष समज देण्यात येऊन त्यांचेविरूध्द अनुशानात्मक कार्यवाही करण्यात येऊन सदरचे प्रकरण निकाली काढण्यात आले आहे.

(४) प्रश्न उपस्थित होत नाही.

-----------------

## सोलापूर शहरात खाजगी मायक्रो फायनान्स कंपनीच्या वसुलीला कंटाळून महिला व पुरुषांनी आत्महत्या केल्याबाबत

**(३६) * ४०९६७ श्री.दत्तात्रय सावंत, श्री.श्रीकांत देशपांडे, श्री.बाळाराम पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर शहरात खाजगी मायक्रो फायनान्स कंपनीमार्फत होणाऱ्या वसुलीच्या जाचाला कंटाळून महिला व पुरुष यांनी आत्महत्या केलेल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या मायक्रो फायनान्स कंपनीकडून कर्ज वसूलीबाबत कंपनीच्या गुंडाकडून होत असलेल्या त्रासामुळे उक्त महिला व पुरुषांनी आत्महत्या केल्याचे प्रथमदर्शिनी निदर्शनास आलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त आत्महत्याग्रस्त कुटुंबातील व्यक्तींनी प्रथम याबाबत पोलीस स्थानकात तक्रार ही केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अनधिकृत व जाचक नियम लावून कर्ज वाटप करून गुंडाकडून कर्ज वसूल करणाऱ्या मायक्रो फायनान्स कंपनी विरोधात गुन्हा दाखल करण्याची मागणी सोलापूर शहरातील सेवाभावी संघटना व नागरिक यांच्याकडून करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार दोषी असलेल्या खाजगी मायक्रो फायनान्स कंपनी विरोधात गुन्हे दाखल करून कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## तळणी (ता.मंठा, जि.जालना) येथील शेतकऱ्यांची व्यापाऱ्याने फसवणूक केल्याबाबत

**(३७) * ३९७६८ प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तळणी (ता.मंठा, जि.जालना) येथील शेतकऱ्यांनी लोणार बाजार समितीमधील आडत व्यापारी श्री.योगेश आर. शर्मा यांना आपल्याकडील रुपये ५० लाख किंमतीची तूर व सोयाबीनची विक्री केली असून पैसे बँकेत जमा करतो असे सांगून सदर व्यापाऱ्याने बँकेत पैसे जमा न केल्याने शेतकऱ्यांची फसवणूक केल्याची घटना माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, फसवणूक झालेल्या शेतकऱ्यांनी बाजार समिती सभापती व संबंधित पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करुनही कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार शेतकऱ्यांना त्यांचे पैसे आडत व्यापारी श्री.शर्मा यांच्याकडून परत मिळण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

तथापि, फसवणूकीची रक्कम रुपये २४.७० लक्ष इतकी आहे.

(२) व (३) हे खरे नाही.

सचिव, कृषी उत्पन्न बाजार समिती लोणार, जि.बुलढाणा यांच्याकडे ४०-५० शेतकऱ्यांनी श्री.योगेश रामेश्वर शर्मा यांचे विरोधात केलेल्या तक्रारीस अनुसरुन पोलीस स्टेशन लोणार येथे दिनांक २१/०१/२०१८ रोजी तक्रार दाखल केली. त्यास अनुसरुन अप नंबर २६/१८ कलम ४२० भा.दं.वि. प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपी योगेश रामेश्वर शर्मा यास दिनांक ३०/०१/२०१८ रोजी अटक करण्यात आली आहे. आरोपी सध्या न्यायालयीन कोठडीत आहे. गुन्हा तपासावर आहे.

तसेच सदर प्रकरणी महाराष्ट्र कृषी उत्पन्न खरेदी विक्री (विकास व नियमन) अधिनियम १९६३ चे कलम ४० (ब) अन्वये जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था बुलढाणा यांनी दिनांक २६/०२/२०१८ रोजी चौकशी समिती नेमली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## परभणी जिल्हयातील शासकीय कार्यालयात बायोमॅट्रीक उपस्थिती नोंदवून वेतन काढण्याबाबत

**(३८) * ३८४७२ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.धनंजय मुंडे, श्री.सतिश चव्हाण, श्री.अमरसिंह पंडित :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी जिल्हयातील सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालयात बायोमॅट्रीक प्रणालीद्वारे उपस्थिती व वेतन काढण्याबाबत जिल्हाधिकारी, परभणी यांनी जा.क्र.२०१४/संकीर्ण/२-९/शासा/कावि, दिनांक ५ मे, २०१४ रोजी वा त्यासुमारास आदेश काढले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासन निर्णय व जिल्हाधिकारी यांचे आदेश डावलून बायोमॅट्रीक प्रणाली न राबविता वेतन काढण्यात येत असल्याबाबत तसेच जाणीवपूर्वक वेळ काढून धोरण राबविण्यात येत असल्याबाबत परभणी येथील सामाजिक कार्यकर्त्यांनी जिल्हाधिकारी, परभणी यांच्याकडे माहे जुलै, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान लेखी तक्रार नोंदविली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन परभणी जिल्ह्यातील सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालयात बायोमॅट्रीक प्रणालीद्वारे उपस्थिती व वेतन काढण्याबाबत काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय हे खरे आहे.
(२) होय खरे आहे, परभणी येथील सामाजिक कार्यकऱ्यांनी मा.अप्पर मुख्य सचिव, सामान्य प्रशासन, मंत्रालय, मुंबई-३२ यांना उद्देशून लिहिलेल्या तक्रारीची प्रत जिल्हाधिकारी परभणी कार्यालयाकडे त्याची प्रत दिलेली आहे.
(३) परभणी जिल्ह्यामध्ये एकूण ६४ कार्यालयामध्ये बायोमॅट्रीक अटेन्डन्स नोंदविले जाते. सद्य:स्थितीत परभणी जिल्ह्यातील ११७ कार्यालयात आधार बेस्ड बायोमॅट्रीक यंत्र पुरविण्यात आलेले आहे. तसेच आधार बेस्ड बायोमॅट्रीक प्रणाली चालू करण्याचे काम प्रगती पथावर आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई महानगरपालिकेतील अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या चौकशीच्या फायली गहाळ झाल्याबाबत

**(३९) * ३८९०८ श्रीमती विद्या चव्हाण, श्री.हेमंत टकले, श्री.धनंजय मुंडे, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई महानगरपालिकेतील सुमारे एक हजार कर्मचारी आणि अधिकारी यांचेविरुध्द विविध प्रकारच्या शिस्तभंगविषयक कारवाई अंतर्गत प्राथमिक चौकशी, खात्यांतर्गत चौकशी, कारणे दाखवा नोटीसा, लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे चौकशी अशी विविध प्रकरणे अनेक वर्षांपासून महापालिकेच्या चौकशी विभागाकडे प्रलंबित असल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त चौकशीच्या अनुषंगाने कारवाई होऊ नये म्हणून अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या चौकशीच्या बहुतांश नस्ती जाणीवपूर्वक गहाळ केल्या असल्याचेही माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी मुंबई महानगरपालिका आयुक्त व प्रधान सचिव, नगरविकास विभाग यांची चौकशी करुन कारवाई करावी, अशी मागणी महानगरपालिका विरोधी पक्षनेते यांनी दिनांक २४ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, गहाळ झालेल्या सदर नस्तींचा शोध घेण्याबाबत वा त्या प्रकरणांच्या नवीन नस्ती तयार करण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) असल्यास, यामध्ये शासकीय योजनांचा अनुदान निधी व महानगरपालिका निधीचा अपहार झाला असल्याने सदर प्रकरणी सर्व्हीस रेग्युलेशन ॲक्टचे उल्लंघन झाल्यामुळे उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून संबंधित दोषीविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या चौकशी खात्याकडे सुमारे २००१ अधिकारी/कर्मचारी यांचा अंतर्भाव असलेली २१४ प्राथमिक चौकशी, २६१ खात्यांतर्गत चौकशीची प्रकरणे माहे डिसेंबर, २०१७ अखेर प्रलंबित आहेत ही वस्तुस्थिती आहे.

(२) अशा स्वरुपाचे वृत्त दिनांक २४/१२/२०१७ रोजीच्या स्थानिक वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द झाले होते ही वस्तुस्थिती आहे.

तथापि, चौकशीच्या नस्त्या गहाळ झाल्या नाहीत असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) सदर बातमीच्या अनुषंगाने लोकप्रतिनिधींनी, मुंबई महानगरपालिकेतील सुमारे १,००० कर्मचारी/अधिकाऱ्यांच्या हरविलेल्या फाईल्सबाबत चौकशी करण्याची विनंती शासनास केलेली आहे.

(४) चौकशी प्रकरणाची कोणतीही नस्ती गहाळ झालेली नाही. त्यामुळे नवीन नस्ती तयार करण्याचा प्रश्न उद्‌भवत नसल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(५) व (६) शासनास प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने, सदर प्रकरणाची चौकशी करण्याच्या सूचना दिनांक ०८/०३/२०१८ रोजीच्या पत्रान्वये बृहन्मुंबई महानगरपालिकेस देण्यात आल्या आहेत.

-----------------

## नियमांचे उल्लंघन करणाऱ्या मेट्रीमोनियल वेबसाईटवर कारवाई करण्याबाबत

**(४०) * ३८६२४ श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.रामनिवास सिंह, श्रीमती स्मिता वाघ, डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मेट्रीमोनियल वेबसाईटच्या माध्यमातून ठाणे जिल्हयाच्या कार्यक्षेत्रात मागील दोन वर्षात सुमारे १०२ विवाहेच्छूक महिला व पुरुषांची फसवणूक झाल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बनावट प्रोफाईल बनवून महिलांची आर्थिक फसवणूक करणाऱ्या ४ नायजेरियन नागरिकांना पोलिसांनी अटक केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त स्वरूपाच्या फसवणूकीच्या घटना कमी करण्यासाठी महिला व बालविकास मंत्रालयाकडून मेट्रीमोनियल वेबसाईटवर निर्बंध घातले असतानाही ही साईटस सर्व नियमांचे उल्लंघन करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार नियमांचे उल्लंघन करणाऱ्या मेट्रीमोनियल साईटसवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे अंशत: खरे आहे

मेट्रीमोनियल वेबसाईटच्या माध्यमातून फसवणूक केल्याबाबत ठाणे शहर पोलीस आयुक्तालयांतर्गत सन २०१६ व सन २०१७ मध्ये एकूण ६ गुन्हे दाखल आहेत व ठाणे ग्रामीण कार्यक्षेत्रांतर्गत सन २०१७ मध्ये एकूण २ गुन्हे दाखल आहेत.

(२) होय, हे खरे आहे.

(३) भारत सरकारच्या सूचना व माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाने माहिती तंत्रज्ञान कायदा, २००० व त्याखालील नियमान्वये मॅट्रीमोनियल वेबसाईट्स यांना दिनांक ०६/०६/२०१६ रोजी मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या आहेत.

(४) सदर प्रकरणी ठाणे पोलीस आयुक्तालयांतर्गत पुढीलप्रमाणे एकूण ६ गुन्हे दाखल असून एकूण ११ आरोपींना अटक करण्यात आलेली आहे.

१. कळवा पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. ४५३/२०१७, भा.दं.वि. कलम ४२० अन्वये गुन्हा नोंद असून तपास सुरु आहे.

२. कासारवडवली पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. ८४/२०१७, भा.दं.वि. कलम ४२० सह कलम ६६ आयटी ॲक्ट २००० अन्वये गुन्हा नोंद असून सद्य:स्थितीत न्यायप्रविष्ठ आहे.

३. वर्तकनगर पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. ३३१/२०१७, भा.दं.वि. कलम ४२०, ३४ सह कलम ६६ (ड) आयटी ॲक्ट २००० अन्वये गुन्हा नोंद असून तपास सुरु आहे.

४. वागळे इस्टेट पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. १६३/२०१७, भा.दं.वि. कलम ४२०, ३४ सह कलम ६६ (क)(ड) आयटी ॲक्ट २००० व परकिय नागरिक कायदा कलम ३, १४ अन्वये गुन्हा नोंद असून सद्य:स्थितीत न्यायप्रविष्ट आहे.

५. डोंबिवली पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. ०६/२०१६, भा.दं.वि. कलम ४२०, ३४ सह कलम ६६ (क)(ड) आयटी ॲक्ट २००० अन्वये गुन्हा नोंद असून सद्य:स्थितीत न्यायप्रविष्ठ आहे.

६. डोंबिवली पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. ३१/२०१६, भा.दं.वि. कलम ४१९, ४२०, ३४ सह सुधारित २००८ चे कलम ६६ (क)(ड) आयटी ॲक्ट २००० अन्वये गुन्हा नोंद असून सद्य:स्थितीत न्यायप्रविष्ठ आहे.

तसेच, सदर प्रकरणी ठाणे ग्रामीण कार्यक्षेत्रांतर्गत पुढीलप्रमाणे एकूण २ गुन्हे दाखल आहेत.

१. काशिमीरा पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. ३१२/२०१७, भा.दं.वि. कलम ४२०, ४०६ अन्वये गुन्हा नोंद असून तपास सुरु आहे.

२. नयानगर पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. ३६९/२०१७, भा.दं.वि. कलम ४२०, ३४ अन्वये गुन्हा नोंद असून तपास सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## गोरेगाव (मुंबई) येथील पत्राचाळीच्या पुनर्विकासाबाबत

**(४१) * ३९२८२ श्री.नरेंद्र पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.अनिल भोसले, श्री.जयवंतराव जाधव, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती विद्या चव्हाण, ॲड.राहुल नार्वेकर : तारांकित प्रश्न क्रमांक ३१६४५ ला दिनांक २ ऑगस्ट, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोरेगाव (मुंबई) येथील पत्राचाळ येथील रहिवाश्यांना सदनिका देण्यास अनेक वर्ष केलेल्या टाळाटाळ प्रकरणी विकासकास म्हाडामार्फत करार रद्द करुन संपूर्ण प्रकल्प ताब्यात घेण्याची नोटीस दिनांक १२ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास पाठविली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार सदरचा संपूर्ण प्रकल्प म्हाडाने ताब्यात घेऊन सदर प्रकल्पातील सदनिकाधारकांना सदनिका मिळाव्यात म्हणून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश महेता :** (१) होय, हे खरे आहे.

(२) पत्राचाळीच्या पुनर्विकासामध्ये काही रहिवाशांना एप्रिल, २०१६ पासूनचे घरभाडे विकासकाने अद्याप अदा न केल्याबद्दल व म्हाडा वसाहतीच्या रखडलेल्या पुनर्विकासाबाबत प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने मा.मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ०३/०५/२०१७ रोजी बैठक घेण्यात आली होती. सदर बैठकीमध्ये मा.मुख्यमंत्री महोदयांनी पुनर्वसन हिस्सा व म्हाडा हिस्सा यांचे बांधकाम कालबध्द मर्यादेत करणे तसेच थकीत भाडे त्वरीत अदा करणे इत्यादीबाबत कालबध्द कार्यक्रम तयार करण्याबाबत निर्देश दिले

होते. विकासकाने याबाबत लेखी आश्वासन देऊनही निर्देशांची पूर्तता केली नसल्याने मा.मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २२/११/२०१७ रोजी बैठक घेऊन प्रकल्पातील पुनर्विकासाबाबतची चुकीची माहिती देणाऱ्या व शासनाची दिशाभूल करण्याऱ्या अधिकाऱ्यावर कारवाई करणे, संपूर्ण प्रकल्प (विक्री हिश्श्यासह) म्हाडाने ताब्यात घेणे व विकासकाने सदर प्रकल्पातील विक्री हिस्सा अन्य विकासकांना दिल्याबाबत कायदेशीर बाबी तपासून पुढील कार्यवाही करण्यात यावी असे निर्देश देण्यात आले व त्याप्रमाणे म्हाडाकडून पुढील कार्यवाही चालू आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कोल्हापूर येथे मिनी बसच्या झालेल्या अपघाताबाबत

**(४२) * ४०५५७ अॅड.जयदेव गायकवाड, श्री.आनंदराव पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.विक्रम काळे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.आनंद ठाकूर, अॅड.राहुल नार्वेकर, श्री.सुनिल तटकरे, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.ख्वाजा बेग, श्री.रामराव वडकुते, अॅड.निरंजन डावखरे, श्री.जगन्नाथ शिंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील बालेवाडीतील केदारी कुटुंबियांची मिनी बस कोल्हापूर येथे पंचगंगा नदीवरील शिवाजी पुलावरुन २० फूट खोल नदीत पडून झालेल्या अपघातात बसमधील १३ व्यक्ती बुडून मृत्यू पावल्याची घटना दिनांक २६ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास घडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार सदर अपघातातील मृत व्यक्तीच्या कुटुंबियांना व जखमींना कोणती आर्थिक मदत केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१)हे खरे आहे.

दिनांक २६ जानेवारी, २०१८ रोजी रात्री ११.३० चे सुमारास कोल्हापूर ते रत्नागिरी रोडवर, आंबेवाडी (ता.करवीर) हद्दीतील पंचगंगा नदीवरील शिवाजी पुलावर मिनी बसच्या चालकाचा बसवरील ताबा सुटल्याने बस

पुलाच्या कठड्याला धडकून नदीपात्रात कोसळली. या दुर्घटनेत लहान बालके, महिला, पुरुष असे १२ प्रवासी व बसचालक मयत झाले असून ३ प्रवासी गंभीर जखमी आहेत.

(२) याप्रकरणी करवीर पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. २०/२०१८, भा.दं.वि. कलम २७९, ३३७, ३३८, ३०४(अ), ४२७ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मयत आरोपी बसचालकाची रक्त तपासणी केली असता चालकाने मद्यसेवन केल्याचे आढळून आल्याने सदर गुन्ह्यामध्ये भा.दं.वि.सं. कलम ३०४(२) व मोटार वाहन कायदा कलम १८५ या वाढीव कलमांचा समावेश करण्यात आला आहे.

मृत व्यक्ती या पुणे जिल्ह्यातील असल्याने त्यांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत देण्याच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, पुणे यांचे कार्यालयामार्फत कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील बेस्ट परिवहन उपक्रम सेवेबाबत

**(४३) * ३९७५० श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील बेस्ट परिवहन उपक्रम सेवेतील १५९ बस भंगारात काढल्याने बेस्ट बसने प्रवास करणाऱ्या प्रवाशांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रवाशांची गैरसोय होऊ नये म्हणून बेस्ट प्रशासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) बेस्ट उपक्रमाने आयुर्मान संपुष्टात येत असलेल्या १५९ बसगाड्या मोडीत काढण्याचा निर्णय घेतला आहे, हे खरे आहे.

(२) प्रवाशांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून बेस्ट उपक्रम १५९ बसगाडया टप्प्याटप्प्याने मोडीत काढणार आहे. अशा प्रकारे प्रवर्तनातून बस गाड्या रद्द करताना प्रवाशांची गैरसोय होणार नाही याकरीता बस सेवेचे फेरनियोजन करण्यात येते.

आयुर्मान संपलेल्या बसगाड्या प्रवर्तनातून रद्द करताना प्रवाशांची गैरसोय होणार नाही याची संपूर्ण काळजी घेण्यात आल्याचे बेस्ट प्रशासनाने कळविले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कफ परेड (मुंबई) येथे “ग्रीन पार्क” उभारण्यात येणार असल्याबाबत

**(४४) * ३७८८६ श्री.प्रकाश गजभिये, श्री.हेमंत टकले, श्री.विक्रम काळे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.सुनिल तटकरे, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.ख्वाजा बेग, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील मेट्रो-३ रेल्वे प्रकल्पाच्या कामातून निर्माण होणाऱ्या टाकाऊ मातीचा भराव भरून कफ परेडमधील गीतानगर ते एनसीपीए परिसरालगत समुद्रात ३०० एकर जमीन निर्माण करुन तेथे “ग्रीन पार्क” उभारण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मातीच्या भरावामुळे कफ परेड परिसरातून मच्छिमारांना समुद्रात जाताना त्रास होणार असल्याने मच्छिमारांनी त्यास विरोध केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त मातीच्या भरावामुळे पर्यावरणाला मोठ्या प्रमाणात धोका पोहचणार असल्याची बाब पर्यावरण तज्ञांनी व्यक्त केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेने दिनांक ०२/०८/२०१७ रोजी शासनास महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३० अन्वये मंजूरीसाठी सादर केलेल्या सुधारित प्रारुप विकास आराखड्यामध्ये सदर पार्कचा प्रस्ताव नियोजिलेला आहे. समुद्रातील नैसर्गिक भागाचे पुन:प्रापण (रिक्लेमेशन) करण्याचा व त्या जागेचा वापर हा अन्य कोणत्याही कारणासाठी न करता केवळ सार्वजनिक मोकळ्या जागेसाठी करणेच्या उद्देशाने बृहन्मुंबई महानगरपालिकेने प्रस्ताव नियोजिलेला आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून, मेट्रो रेल्वे तसेच गरजेनुसार इतर स्त्रोतातून निघणारी माती या पुन:प्रापण (रिक्लेमेशन) करणेसाठी वापरणेचे प्रस्तावित आहे.

(२) होय.

तथापि, स्थानिक मच्छिमार समूहाचे समुद्रात जाणे-येणे करण्याचे हक्क अबाधित राहतील याचा विचार करुन बृहन्मुंबई महानगरपालिकेने प्रस्ताव नियोजिलेला आहे.

(३) मुंबई महापालिकेने पर्यावरणावर होणारा आघात मूल्यमापन अभ्यास करण्याकरिता सीएसआयआर-एनआयओ आणि सीएसआयआर-नीरी या तज्ञ संस्थांची नेमणूक केलेली आहे व त्यांचा अहवाल अद्यापी प्राप्त होणेचा आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## महाड (जि.रायगड) एमआयडीसी व ठाणे जिल्हयात कार्यरत असलेल्या एका कंपनीमध्ये मादक पदार्थ तयार होत असल्याबाबत

**(४५) * ३९९७५ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाड (जि.रायगड) एमआयडीसी मधील व ठाणे जिल्हयात कार्यरत असलेल्या एकाच कंपनीमध्ये नशेसाठी वापरण्यात येत असलेला मादक पदार्थ तयार होत असल्याचे संशयातून दिनांक १५ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास अंमलीपदार्थ विरोधी पथकाने छापा टाकून कंपनीतील ३ कामगारांसह अन्य ६ जणांना अटक करण्यात आली असून सुमारे १.५५ किलोग्रॅम पांढऱ्या रंगाची सुडोइफिड्रीन पावडर जप्त केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हा पदार्थ अंमलीपदार्थ विभागाच्या प्रतिबंधात्मक यादीमध्ये असल्याचे नमूद करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सुडोइफेड्रिन हे रसायन खोकल्यावरील औषध तयार करण्यासाठी वापरण्यात येत असून सदर कारखान्यातून बेकायदेशिरपणे त्याचा वापर अंमलीपदार्थ तयार करण्यासाठी केला जात आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करून संबंधित कंपनी प्रशासनावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हो हे खरे आहे. तथापि सदरील कारवाई पोलीस ठाणे महाड यांनी केली नसून केंद्र शासनाच्या नारकोटीक्स कंट्रोल ब्युरो यांनी केली आहे. त्यांनी सदरील गुन्हा रजि.नं. ०१/२०१८ एनडीपीएस ॲक्ट कलम १९८५ नुसार दाखल केला आहे.
(२), (३) व (४) सदर प्रकरणी केंद्र शासनाच्या नारकोटीक्स कंट्रोल ब्युरो यांनी कारवाई केलेली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील मोनो रेल्वेच्या कामास विलंब होत असल्याबाबत

**(४६) * ३८३३० श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.धनंजय मुंडे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.अमरसिंह पंडित, ॲड.निरंजन डावखरे, श्री.संजय दत्त : तारांकित प्रश्न क्रमांक २८५८४ ला दिनांक १५ मार्च, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील मोने रेल्वेचा चेंबूर ते वडाळा हा पहिला टप्पा आग लागल्याने बंद असून दुसरा टप्पा वडाळा ते जेकब सर्कल सन २०१५ मध्ये सुरु होणे अपेक्षित असताना सन २०१८ मध्येही सुरु न झाल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दुसऱ्या टप्प्याचे काम करणाऱ्या लार्सन ॲण्ड टुब्रो व स्कोमी या कंपन्यांना विलंबाबाबत एमएमआरडीएने प्रतिदिन रुपये साडेसात लाख दंड केला असून दोन्ही कंपन्यांकडून दंडाची किती रक्कम वसूल करण्यात आली आहे,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मुंबईतील मोनो रेल्वेच्या कामास गती मिळण्याच्यादृष्टीने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय.
(२) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने मे.लार्सन ॲण्ड टुब्रो व स्कोमी या समुहास विलंबाकरीता दंड आकारण्याची नोटीस दिलेली असून जोपर्यंत दुसऱ्या टप्प्याचे काम सुरु होत नाही तोपर्यंतची दंड आकारणी त्यांच्या देयकामधून एकत्रित रक्कम वसूल करण्याचे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत नियोजित आहे.
(३) प्रवाशांसाठी मोनो रेल्वेच्या सेवा सुरु करण्याच्यादृष्टीने रेल्वे सुरक्षा आयुक्त हे माहे मार्च, २०१८ च्या तिसऱ्या आठवडयामध्ये सदर प्रकल्पास भेट देणार असून, त्यांचे सुरक्षा प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर मोनोरेलचा संत गाडगे महाराज चौक ते चेंबूर हा मार्ग प्रवास वाहतुकीसाठी खुला करण्याचे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत नियोजित आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## उरण येथील साडेबारा टक्के योजनेंतर्गत दिलेला भूखंड सिडको अधिकाऱ्यांनी संगनमताने विकासकास वितरीत केल्याबाबत

**(४७) * ३९२३१ श्री.धनंजय मुंडे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.अमरसिंह पंडित, ॲड.निरंजन डावखरे, श्री.किरण पावसकर, ॲड.राहुल नार्वेकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) साडेबारा टक्के योजनेंतर्गत उरण येथील सैद मुल्ला कुटुंबियांना दिलेला रुपये १८ कोटी किंमतीचा भूखंड सिडको अधिकाऱ्यांनी संगनमताने विकासकाला वितरीत केल्याची घटना दिनांक १६ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) हे खरे नाही.

दिनांक ०७/०५/२००८ रोजी राबविण्यात आलेल्या संगणकीय सोडतीत रोडपाली नोड, सेक्टर-२० येथील १६५० चौ.मी. क्षेत्राचा भूखंड भूधारक श्री.झैद मुल्ला यांना इरादापत्रात नमूद केलेल्या अटी व शर्तीसह इरादित केला आहे. तथापि, इरादित भूखंडाच्या वाटपासाठी अटी व शर्तीनुसार आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करण्यात आलेल्या नसल्याने सदरहू भूखंडाचे वाटप करण्यात आलेले नाही.

सदरहू भूखंड अद्यापही श्री.झैद मुल्ला व इतर यांचे नावे इरादित आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे येथे पतंगाच्या चिनीमांजामुळे महिलेचा मृत्यू झाल्याबाबत

**(४८) * ४०९२० श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे येथे दैनिक सकाळमध्ये कार्यरत असणाऱ्या महिला कर्मचारी कु.सुवर्णा मनोहर मुजुमदार या रस्त्याने जात असताना पतंगाचा चिनीमांजा त्यांच्या गळयाला गुंडाळल्यामुळे दिनांक ११ फेब्रुवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास त्यांचा मृत्यू झाला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार सदर महिला कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियास आर्थिक मदत देण्याबाबत व भविष्यात अशा घटना घडू नयेत म्हणून पंतगाच्या मांजावरती बंदी आणण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.
(२) कु.सुवर्णा मनोहर मुजुमदार या दिनांक ०७/०२/२०१८ रोजी १८.०० वा चे सुमारास सिमला ऑफीस चौकाकडे जात असतांना, शिवाजी पुलावर मध्यभागी रोडवर कोणीतरी अज्ञात इसमाने पतंग उडविण्यासाठी वापरण्यात आलेला नायलॉनचा मांजा निष्काळजीपणे रस्त्यावर सोडल्याने, सदरचा मांजा कु.मुजुमदार यांच्या गळ्यात अडकल्याने त्यांना जबर दुखापत झाली व त्यांच्यावर औषधोपचार चालू असतांना दिनांक ११/०२/२०१८ रोजी सकाळी ७.०० वा. त्यांचा मृत्यू झाला.

सदर घटनेबाबत शिवाजीनगर पोलीस स्टेशन येथे गुरनं २६/२०१८, भादंवि क्र. ३३८,३०४,३०४ (अ) प्रमाणे दिनांक ०७/०२/२०१८ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्हयाचे तपासात १८ साक्षीदार तपासण्यात आले आहेत. गुन्हा तपासावर आहे. अशा प्रकारच्या घटना घडू नयेत म्हणून मांजा विक्रेत्यांना सी.आर.पी.सी.क. १४९ प्रमाणे नोटीसा देण्यात आल्या आहेत.

पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन यांचे दिनांक १८/०८/२०१६ च्या पत्रान्वये नायलॉन मांज्यावरील बंदी संदर्भात पर्यावरण (संरक्षण) अधिनियम, १९८६ चे कलम ५ अन्वये निर्देश देण्यात आले आहेत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईत म्हाडा व महानगरपालिकेतर्फे बांधण्यात आलेल्या शौचालयांच्या बांधकामात गैरव्यवहार झाल्याबाबत

**(४९) * ४०२८३ श्री.परिणय फुके :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत म्हाडा व महानगरपालिकेतर्फे बांधण्यात आलेल्या शौचालयांच्या बांधकामात व दुरूस्तीमध्ये गैरव्यवहार झाल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गैरव्यवहार प्रकरणी चौकशी करुन दोषींवर कारवाई करावी अशी मागणी मा.मुख्यमंत्री महोदयांकडे पत्राद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबई महानगरपालिकेच्या एस.डब्ल्यू.एस. विभागाकडून माहितीचा अधिकार अंतर्गत मिळालेल्या अहवालानुसार सदर मागणी केली असून सदर पत्रासोबत अहवाल जोडण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) दैनिक मुंबई मिरर या वृत्तपत्राच्या दिनांक ०२/०८/२०१७ रोजीच्या वृत्तपत्रातील बातमीनुसार, श्री.अनिल गलगली यांनी माहिती अधिकार अंतर्गत माहिती प्राप्त करुन घेऊन, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अधिकाऱ्याने सादर केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी करण्याबाबत विनंती केली आहे.

(२) व (३) अशा स्वरुपाची तक्रार मुख्यमंत्री सचिवालयास प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.

(४) सदर प्रकरणी बृहन्मुंबई महानगरपालिकेस चौकशी करण्याचे आदेश देण्यात आले असून, महानगरपालिकेमार्फत चौकशी करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मालवणी (मालाड) येथे पोलीस हौसिंग फेडरेशनने बांधलेल्या घरांबाबत

**(५०) * ३७९३५ ॲड.अनिल परब, श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) म्हाडाच्या मुंबई मंडळाने पोलिसांच्या घरांसाठी पोलीस हौसिंग फेडरेशनला मालवणी (मालाड) येथील दादासाहेब गायकवाड नगर यथे २३ हेक्टरचा भूखंड दिला होता व त्या परिसरातील चाळींचा पुनर्विकास सदर फेडरेशनमार्फत करण्यास म्हाडाने परवानगी दिली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त भूखंडावर संस्थेने ९५४ घरे बांधली त्यापैकी २०९ घरे म्हाडाला हस्तांतरित केली आहेत व उर्वरित घरे पोलिसांना देणे आवश्यक होते परंतु त्या घरांची खुल्या बाजारात विक्री केली गेली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, हृया संपूर्ण प्रकरणी उक्त संस्थेने म्हाडाच्या अटी व शर्तीचे उल्लंघन केल्याने म्हाडाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश महेता :** (१) उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, म्हाडा यांचेकडून प्राप्त अहवालानुसार विनियम (१६) अन्वये सन १९९९ मध्ये महाराष्ट्र पोलीस हौसिंग फेडरेशनला वितरीत करण्यात आलेल्या दादासाहेब गायकवाड नगर येथील २३ हेक्टर भूखंडापैकी मुंबई मंडळाच्या ठराव क्र. २४२/२५२४ व म्हाडाच्या ठराव क्र. ६६५९ अन्वये महाराष्ट्र पोलीस फेडरेशनला योजना सी-१ भूखंडावरील १.२ हेक्टर क्षेत्रासाठीच सिमीत करण्यात आली आहे.

(२) व (३) योजना सी-१ भूखंडावरील बांधण्यात आलेल्या ९५४ गाळ्यांपैकी म्हाडास देय असलेल्या २०९ गाळ्यांची कार्यकारी अभियंता, गोरेगाव, मुंबई मंडळ, म्हाडा यांचेमार्फत दिनांक १३ व १४ मार्च, २०१४ रोजी तपासणी करुन सदर गाळ्यांमध्ये आढळून आलेले दोष सचिव, महाराष्ट्र पोलीस हौसिंग फेडरेशन यांच्या निदर्शनास आणण्यात आले. तसेच दिनांक २१/०३/२०१४ व दिनांक ०६/०६/२०१४ रोजीच्या पत्राने सदरहू त्रुटी/दोष दूर करण्याबाबत तसेच अन्य मुद्दयांची पूर्तता करण्याबाबत पोलीस हौसिंग फेडरेशनला म्हाडाने

कळविले. तथापि, सदरहू संस्थेने म्हाडास देय असलेली २०९ घरे बांधकामातील त्रुटी/दोष दूर करुन अद्यापही म्हाडास हस्तांतरीत केलेली नाहीत. उर्वरित घरांची खुल्या बाजारात विक्री केली आहे.

तसेच सदरहू संस्थेने म्हाडाच्या अटी व शर्तींचा भंग केल्याने सदर भूखंड म्हाडाच्या ताब्यात घेण्याबाबत शासनाकडे शिफारस केली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अंबरनाथ (जि.ठाणे) नगरपरिषद क्षेत्रात अवैधरित्या बांधकाम केल्याबाबत

**(५१) * ४०४०१ श्री.रामहरी रुपनवर : तारांकित प्रश्न क्रमांक ३७२०२ ला दिनांक २० डिसेंबर, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबरनाथ (जि.ठाणे) नगरपरिषद क्षेत्रात अवैधरित्या बांधकाम होत असल्याप्रकरणी संचालक, नगरपालिका प्रशासन, वरळी, मुंबई यांना शासनाच्या दिनांक ३१ ऑक्टोबर, २०१७ रोजीच्या पत्रान्वये उचित कार्यवाहीबाबतचा अहवाल मागविण्यात आला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय, अहवालाच्या अनुषंगाने उपरोक्त नगरपरिषद क्षेत्रातील अवैधरित्या बांधकाम करणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) अंबरनाथ नगरपरिषद क्षेत्रात “अवैधरित्या बांधकाम” होत असल्याबाबतचे स्थानिक नगरसेवकाचे दिनांक १३/१०/२०१७ रोजीचे निवेदन दिनांक ३१/१०/२०१७ रोजीच्या पत्रान्वये उचित कार्यवाहीकरीता संचालक, नगरपालिका प्रशासन, वरळी, मुंबई व मुख्याधिकारी, अंबरनाथ नगरपरिषद यांच्याकडे पाठविले, हे खरे आहे.

(२) सदर निवेदनातील नमूद इमारतीच्या बांधकामास विकास नियंत्रण नियमावलीतील तरतुदीनुसार परवानगी दिली असल्याचे नगरपरिषदेमार्फत निवेदनकर्त्यास कळविण्यात आले आहे.

आयुक्त तथा संचालक, नगरपालिका प्रशासन संचालनालय यांचा अहवाल प्रलंबित असून त्यांना दिनांक १०/०३/२०१८ पर्यंत अहवाल सादर करण्याबाबत निर्देश देण्यात आले आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यसेवा पूर्व परीक्षेसाठी घेतल्या जाणाऱ्या सीसॅट पेपरबाबत

**(५२) * ३९६५८ डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केंद्रिय लोकसेवा आयोगाकडून घेतल्या जाणाऱ्या परीक्षेनुसार राज्य लोकसेवा आयोगाने अनुसरलेल्या पध्दतीनुसार राज्यसेवा पूर्व परीक्षेसाठी घेतल्या जाणाऱ्या सीसॅट पेपरच्या रचनेचा अभियांत्रिकी, वैदकीय व विज्ञान शाखेच्या विद्यार्थ्यांना फायदा होत असून इतर शाखेच्या विद्यार्थ्यांवर अन्याय होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या सीसॅट पेपरच्या संदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई महानगरपालिकेतील रस्ते गैरव्यवहाराबाबत

**(५३) * ३९५२६ श्री.हेमंत टकले, श्री.विक्रम काळे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.सुनिल तटकरे, ॲड.जयदेव गायकवाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.ख्वाजा बेग, श्री.रामराव वडकुते : तारांकित प्रश्न क्रमांक ३८५०२ ला दिनांक ७ मार्च, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील ३४ रस्ते गैरव्यवहाराच्या पहिल्या टप्प्यातील चौकशीत महापालिकेच्या सेवेतील ९६ अभियंते दोषी आढळल्यानंतर दुसऱ्या टप्प्यातील चौकशीत २०० अभियंते दोषी आढळून आले असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार सदर अभियंत्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेतील रस्ते दुरुस्ती गैरव्यवहारप्रकरणी टप्पा-१ अंतर्गत करण्यात आलेल्या चौकशीमध्ये १०० अभियंतावर्गीय कर्मचाऱ्यांवर दोषारोपपत्रे बजावण्यात आली असून त्यापैकी ९६ अभियंते दोषी आढळले आहेत.

टप्पा-२ अंतर्गत करण्यात आलेल्या चौकशीमध्ये १६९ अभियंतावर्गीय कर्मचाऱ्यांवर दोषारोपपत्रे बजावण्यात आली असून त्यापैकी १६७ अभियंते दोषी आढळले आहेत.

उपरोक्त दोन्ही चौकशीमध्ये ८४ अभियंते सामायिक आहेत.
(२) व (३) सदर सामायिक असलेल्या ८४ अभियंत्यांना दोन्ही टप्प्यांत केलेल्या चौकशीत जी जास्त शिक्षा असेल ती अंतिम करण्यात आली आहे.

सदर प्रकरणी आढळून आलेल्या अनियमिततांबाबत १८५ अभियंतावर्गीय कर्मचाऱ्यांपैकी १८० दोषी कर्मचाऱ्यांना खालीलप्रमाणे शिक्षा देण्यात आल्या आहेत :-

| शिक्षेचे स्वरुप | दोषी कर्मचाऱ्यांची संख्या |
|---|---|
| सेवेतून काढून टाकणे | ०६ |
| पदावनत करणे | २३ |
| पुढील देय वेतनवाढ तीन वर्षांच्या कालावधीकरिता कायमस्वरुपी परिणामाने रोखून धरणे | १३ |

| | |
|---|---|
| पुढील देय वेतनवाढ दोन वर्षांच्या कालावधीकरिता कायमस्वरुपी परिणामाने रोखून धरणे | १७ |
| पुढील देय वेतनवाढ एक वर्षाच्या कालावधीकरिता कायमस्वरुपी परिणामाने रोखून धरणे | ६७ |
| पुढील देय वेतनवाढ एक वर्षाच्या कालावधीकरिता हंगामी स्वरुपात रोखून धरणे | ३१ |
| रुपये १०,०००/- इतका दंड करणे | १६ |
| मूळ निवृत्तीवेतन काही कालवाधीकरिता कमी करणे/ निवृत्तीवेतनातून काही रक्कम काढून घेणे | ०६ |
| ठपका ठेवणे | ०१ |
| एकूण | १८० |

-----------------

## पुणे महानगरपालिकेकडे जलसंपदा विभागाची थकबाकी थकीत असल्याबाबत

**(५४) * ३८७९२ श्री.अनिल भोसले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरासाठी खडकवासला धरणसाखळीतून घेतल्या जाणाऱ्या पाण्याची ३५४ कोटी ७६ लाख रुपयांची जलसंपदा विभागाची थकबाकी पुणे महानगरपालिकेकडे थकीत असल्याची बाब माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर थकबाकी वेळेत न भरल्यास जलसंपदा विभागाकडून धरणाची दुरुस्ती करण्यात येणार नसल्याची बाबही निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार महानगरपालिकेकडे असलेली पाण्याची थकबाकी जलसंपदा विभागाला देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३)

- खडकवासला संयुक्त प्रकल्पांतर्गत पुणे शहरासाठी एकूण ११.५० टीएमसी वार्षिक पाणी कोटा मंजूर करण्यात आला आहे.
- त्यानुसार पुणे महानगरपालिका व जलसंपदा विभाग, पुणे यांच्यात फेब्रुवारी, २०१९ पर्यंत ६ वर्षाचा करारनामा झालेला आहे.
- जलसंपदा विभाग, पुणे यांनी पुणे महानगरपालिकेस सन २०१२-२०१३ ते सन २०१६-२०१७ या कालावधीमधील वापरलेल्या पाण्याकरीता रुपये ३५४.७३ कोटी व नियमित पाणी पट्टीची थकीत रक्कम रुपये ३३.२८ कोटी अशी एकूण रुपये ३८८.०४ कोटी एवढी रक्कम अदा करण्याबाबत कळविलेले आहे हे खरे आहे.
- जलसंपदा विभागाच्या दिनांक १७/११/२०१६ च्या शासन निर्णयातील निर्देशानुसार सिंचन व बिगर सिंचन पाणीपट्टीच्या वसूल रकमेतून सिंचन प्रकल्पांची सर्व देखभाल व दुरूस्ती तसेच आस्थापना खर्च भागविण्याचे निर्देश आहेत.
- त्यामुळे खडकवासला, वरसगाव व पानशेत या धरणांची सुरक्षेची कामे व नियमित कामे पुणे महानगरपालिकेकडून वूसल झालेल्या पाणीपट्टीतूनच करावी लागणार आहेत असे जलसंपदा विभागाने कळविले आहे.
- थकीत बिल भरण्याच्या अनुषंगाने पुणे महानगरपालिकेमार्फत जलसंपदा विभाग, पुणे यांच्याकडे समन्वय साधून थकबाकीची रक्कम निश्चित करण्याबात कार्यवाही सुरू आहे.
- सदरची रक्कम निश्चित झाल्यानंतर पुणे महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकात आवश्यक तरतूद करून थकबाकी भरण्याची कार्यवाही करण्याचे प्रयोजन आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई महानगरपालिकेच्या परिक्षेत्रातील आरोग्य सेविकांच्या समस्या सोडविण्याबाबत

**(५५) * ३८३८६ ॲड.राहुल नार्वेकर, श्री.हेमंत टकले, श्री.आनंद ठाकूर, श्रीमती स्मिता वाघ :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेच्या परिक्षेत्रात ४ हजार आरोग्य सेविका कार्यरत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यांना किमान वेतन अधिसूचनेप्रमाणे वेतन देण्यात येत नाही व प्रशासनाकडून कोणतीही कार्यवाही होत नसल्यामुळे आरोग्य सेविकांनी दिनांक २९ जून, २०१७ रोजी वा त्यासुमारास कामगार आयुक्तालयावर मोर्चाचे आयोजन केले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून उक्त आरोग्य सेविकांच्या समस्या सोडविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात एकूण ३७०० आरोग्य स्वयंसेविका कार्यरत आहेत ही वस्तुस्थिती आहे.

(२) व (३) महानगरपालिका आरोग्य सेवा कर्मचारी संघटना, मुंबई यांनी दिनांक २९/०६/२०१७ रोजी महिला आरोग्य सेविकांच्या किमान वेतनाबाबतची प्रकरणे मा.उच्च न्यायालय/कामगार न्यायालय/औद्योगिक न्यायालयात प्रलंबित असल्याबाबत लेखी निवेदन सादर केल्याचे कामगार आयुक्त यांनी कळविले आहे.

- किमान वेतन अधिनियम, १९४८ च्या कलम २० अन्वये आरोग्य सेविकांना किमान वेतन मिळत नसल्याप्रकरणी कामगार आयुक्त यांचेकडे २२१८ आरोग्य सेविकांचे १७ दावे वसुलीसाठी दाखल करण्यात आले आहेत. सदर प्रकरणी वसुली अधिकारी यांचेसमोर सुनावणी सुरु आहे.

- विविध आरोग्य केंद्रातील आरोग्य सेविकांच्यावतीने किमान वेतन तसेच घरभाडे भत्ता व प्रसूती लाभ मिळण्यासाठी संयुक्त तक्रार दाखल करण्यात आलेली आहे.
- त्यानुसार संबंधित क्षेत्रिय कामगार अधिकारी यांच्यामार्फत व्यवस्थापनास कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे.
- सद्य:स्थितीत सदर प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मिरा-भाईंदर (जि.ठाणे) शहरातील अनेक ऑर्केस्ट्रा बार, लॉज व हॉटेलमध्ये अग्निशमन यंत्रणा उभारली नसल्याबाबत

**(५६) * ३८७४३ श्री.प्रविण दरेकर, श्री.नागोराव गाणार, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.गिरीशचंद्र व्यास :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मिरा-भाईंदर (जि.ठाणे) शहरातील अनेक ऑर्केस्ट्रा बार, लॉज व हॉटेलमध्ये अग्निशमन यंत्रणा उभारल्याचा परवाना तसेच आपत्कालिन प्रसंगासाठी उपाययोजना केल्या नसल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून अशा ऑर्केस्ट्रा बार, लॉज व हॉटेलवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, सदरच्या कारवाईची सद्य:स्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) मिरा-भाईंदर महानगरपालिकेने सन २०१७ मध्ये एकूण ३१६ आस्थापनांचे सर्वेक्षण केले असून, सर्वेक्षणाअंती ९ आस्थापनांकडे अग्निशमन यंत्रणा उभारल्याचा परवाना नसल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) मिरा-भाईंदर शहरातील ऑर्केस्ट्रा बार, लॉज व हॉटेलमध्ये अग्निशमन यंत्रणा न उभारलेल्या एकूण ९ आस्थापनांना महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम, २००६ अन्वये नोटीस बजावण्यात आल्या असून, अग्निशमन यंत्रणा उभारणेबाबत महानगरपालिकेमार्फत निर्देश देण्यात आले आहेत.

(३) उपरोक्त नमूद ९ आस्थापनांपैकी ५ आस्थापनांनी अग्निशमन यंत्रणा उभारून अग्निशमन दलाचा “ना-हरकत” दाखला प्राप्त केला आहे.

उर्वरित ४ आस्थापनामध्ये अग्निशमन यंत्रणा उभारणीचे काम प्रगतीपथावर आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कल्याण-डोंबिवली महानगरपालिका हद्दीमध्ये नव्याने समाविष्ट झालेल्या गावातील पाणी समस्या सोडविण्याबाबत

**(७७) * ३९०८२ श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.रविंद्र फाटक, अॅड.निरंजन डावखरे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.हेमंत टकले :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-डोंबिवली महानगरपालिका हद्दीमध्ये २७ गावांचा समावेश होऊन दोन वर्षाचा कालावधी झाला तरी या गावांमध्ये पाणी समस्या गंभीर झाली असून याबाबत प्रशासनाकडे वारंवार तक्रार करुनही समस्या सोडविण्यात आली नसल्याची बाब माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील २७ गावांना ६० एमएलडी पाणीपुरवठा करण्याची गरज असताना फक्त २० एमएलडी पाणीपुरवठा करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त २७ गावांना पाणी अपुरे पडत असल्याने मा.जलसंपदा मंत्री यांनी दिनांक २८ सप्टेंबर, २०१६ रोजीच्या बैठकीत २० एमएलडी इतके अतिरिक्त पाणी देण्याचे निर्देश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार उक्त गावांना अतिरिक्त पाणी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) दिनांक ०१ जून, २०१५ रोजी कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेमध्ये २७ गावांचा समावेश करण्यात आला. या भागामध्ये महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून घेतलेल्या विविध नळ जोडण्यांद्वारे पाणीपुरवठा करण्यात येतो.

सदर २७ गावांकरीता सद्य:स्थितीत ६० द.ल.ली. प्रतिदिन इतका पाणीपुरवठा आवश्यक असून प्रत्यक्षात ४५ ते ४८ द.ल.ली. प्रतिदिन पाणीपुरवठा होत आहे.

२७ गावातील झपाट्याने वाढत असलेल्या नागरिकीकरणामुळे पाणीपुरवठा कमी पडत असल्याने आवश्यकतेनुसार टँकरने पाणीपुरवठा करण्यात येतो.

(३) मा.मंत्री (जलसंपदा) यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या दिनांक २८/०९/२०१६ रोजीच्या बैठकीत महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून १० टक्के जादा पाणीपुरवठा करणेसाठी निर्देश देण्यात आले.

(४) केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियानांतर्गत कल्याण-डोंबिवली महानगरपालिका हद्दीमध्ये नव्याने समाविष्ट झालेल्या २७ गावांसाठी रुपये १८०.८१ कोटी किंमतीची पाणीपुरवठा योजना शासनाने मंजूर केली आहे.

सदर योजनेमध्ये २१ कि.मी. उर्ध्ववाहिनी, १७ कि.मी. लांबीची गुरूत्ववाहिनी, २८ जलकुंभ व २२३ कि.मी. वितरण व्यवस्थेचा प्रामुख्याने समावेश आहे.

सदर प्रकल्पाची निविदा अंतिम टप्प्यामध्ये आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## तलासरी उड्डाणपुलाखालील बेकायदा टपऱ्या हटविण्याबाबत

**(५८) * ४०५४० श्री.रविंद्र फाटक :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यातील तलासरी उड्डाणपुलाखाली अधिकाऱ्यांच्या संगनमताने बेकायदा टपऱ्या उभारण्यात आल्या असून त्याठिकाणी अवैध धंदे सुरु असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त उड्डाणपुलाखालचा सर्व भाग बेकायदा टपऱ्यानी व्यापलेला असल्याने वाहतूक कोंडी होऊन अपघात होत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात संबंधित पोलीस स्टेशनकडे सातत्याने तक्रार करुनही दुर्लक्ष करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार उपरोक्त बेकायदा टपऱ्या हटविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे अंशत: खरे आहे.

पालघर जिल्ह्यातील तलासरी उड्डाणपुलाखाली बेकायदा टपऱ्या उभारण्यात आल्या होत्या. परंतु त्या उड्डाणपुलाखाली कोणतेही अवैध धंदे सुरु नव्हते.

(२) व (३) हे खरे नाही.

(४) सदर प्रकरणी पोलीस ठाण्याकडून बेकायदेशीर टपरीधारकांची बैठक घेवून टपऱ्या काढण्याबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत. तसेच पालघर जिल्ह्यातील तलासरी उड्डाणपुलाखालील टपऱ्या उड्डाणपुलाचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर काढण्यात आल्या आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मालेगाव (जि.नाशिक) शहरात घरफोडया व जबरी चोऱ्यांच्या गुन्हयात वाढ झाल्याबाबत

**(५९) * ३९४६६ डॉ.अपूर्व हिरे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालेगाव (जि.नाशिक) शहरातील सटाणा नाका तसेच अन्य भागात दिनांक २९ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास एकाच दिवशी सहा ठिकाणी घरफोडीच्या घटनात चोरट्यांनी लाखो रुपयांचा ऐवज चोरून नेला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त शहरात विविध ठिकाणी विशेषतः पश्चिम भागात घरफोडयांचे सत्र सुरु असल्याने तसेच स्थानिक पोलीस प्रशासन गुन्हेगारीवर नियंत्रण प्रस्थापित करण्यास अपयशी ठरल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, गत दोन महिन्यात उपरोक्त शहरात झालेल्या घरफोड्याच्या गुन्ह्यांचा तपास पोलिसांनी पूर्ण केला आहे काय, त्यात काय निष्पन्न झाले व किती गुन्हेगारांना अटक करण्यात येवून चोरीस गेलेला किती मुद्देमाल व ऐवज चोरटयांकडून हस्तगत करण्यात आलेला आहे,

(४) असल्यास, वाढत्या घरफोडया, जबरी चोरी व लुटीचे प्रकारांना अटकाव घालण्याच्या अनुषंगाने व जनतेच्या वित्ताचे रक्षण करण्याच्यादृष्टीने कोणती प्रतिबंधात्मक कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) दिनांक २८/१२/२०१७ रोजी एका ज्वेलर्स दुकान व एका घरात चोरी झाले प्रकरणी छावणी पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. २६१/२०१७ भा.दं.वि.कलम ३८०, ४५७, ५११, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून रुपये ३०४००/- मुद्देमाल चोरीस गेला आहे. त्यापैकी रुपये ३१००/- चा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. सदर प्रकरणात २ संशयित आरोपींना अटक करण्यात आली असून, आरोपी सध्या न्यायालयीन कोठडीत आहेत.

सदर कालावधी दरम्यान सदर परिसरातील एका दुकानात चोरी करण्याचा प्रयत्न करण्यात आला मात्र त्यात मालमत्ता चोरीस गेलेली नाही.

(४) अशा प्रकारच्या गुन्ह्यांना प्रतिबंध घालण्यासाठी दिवसा व रात्री पेट्रोलिंग, जास्तीत जास्त बिट मार्शलची नेमणूक, सी.सी.टि.व्ही. कॅमेरे लावणे, परिसरातील नागरिकांच्या बैठका घेणे अशा उपाययोजना करण्यात आल्या आहेत.

(५) विलंब झालेला नाही.

-----------------

## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील विद्यार्थीनीने आत्महत्या केल्याबाबत

**(६०) * ३९५८० श्री.सुनिल तटकरे, ॲड.जयदेव गायकवाड, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.ख्वाजा बेग, श्री.रामराव वडकुते, ॲड.निरंजन डावखरे, श्री.हेमंत टकले, श्री.विक्रम काळे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील वनस्पतीशास्त्र शाखा या विभागात दुसऱ्या वर्षात शिकणाऱ्या कु.रेश्मा गायकवाड या विद्यार्थीनीने दिनांक १६ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास वसतिगृहात गळफास लावून आत्महत्या केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले आहे व तदनुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय हे खरे आहे.

(२) श्री.रविंद्र महादेव गायकवाड, वय ४८ वर्षे, रा.नारायण गव्हाण, ता.पारनेर, जि.अहमदनगर यांची मुलगी कु.रेश्मा गायकवाड, वय वर्षे २२ हिने सिटी बोरा कॉलेज, ता.शिरुर, जि.पुणे येथे बी.एस.सी. पर्यंतचे शिक्षण पूर्ण केले व पदव्युत्तर शिक्षणासाठी तिने सावित्रीबाई फुले, पुणे विद्यापीठ येथे प्रवेश घेतला होता व तेथेच होस्टेलमध्ये राहत होती.

सदर गुन्ह्यातील आरोपी किशोर हनुमंत रणदिवे रा.राजापूर, ता.श्रीगोंदा, जि.अहमदनगर व कु.रेश्मा या दोघांचे प्रेम प्रकरण होते. त्यांच्यामध्ये सतत छोट्या-मोठ्या बाबींवरुन वाद होत होते. आरोपी कु.रेश्मा हिला “मी तुझ्या पप्पांना मारील” अशी तीन वर्षापासून सतत धमकी देत होता. त्यामुळे या सततच्या त्रासाला कंटाळून कु.रेश्मा हिने दिनांक १५/०१/२०१८ रोजी दुपारी १४.४५ वा. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात हॉस्टेल नं. ३, रुम नं. ५० मध्ये ओढणीच्या सहाय्याने पंख्याला गळफास घेऊन आत्महत्या केली.

सदर घटनेच्या अनुषंगाने तक्रारदार श्री.रविंद महादेव गायकवाड यांनी दिलेल्या तक्रारीवरुन दिनांक १६/०१/२०१८ रोजी चतु:श्रृंगी पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. २२/२०१८ भा.दं.वि. कलम ३०६, ५०६, ३२३ प्रमाणे किशोर हनुमंत रणदिवे, रा.राजापूर, ता.श्रीगोंदा, जि.अहमदनगर यांचेविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला असून, सदर गुन्ह्यात त्यांस दिनांक १७/०१/२०१८ रोजी २०.४५ वा. अटक करण्यात आली असून, गुन्ह्याचे तपासात ४ साक्षीदार तपासण्यात आले आहेत. तसेच मयत तरुणीने लिहिलेली सुसाईड नोट व मोबाईल गुन्ह्याच्या पुराव्याकामी जप्त करण्यात आले असून त्याबाबतचा अधिक तपास सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सांगली शहर पोलिसांनी पोलीस कोठडीत केलेल्या मारहाणीत आरोपीचा मृत्यू झाल्याबाबत

**(६१) * ३९७४२ श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, ॲड.राहुल नार्वेकर, डॉ.सुधीर तांबे, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.हरिसिंग राठोड, श्री.सुभाष झांबड, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.मोहनराव कदम :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली शहर पोलिसांनी दिनांक ६ नोव्हेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास लुटमारीच्या गुन्हयात अटक केलेला आरोपी अनिकेत कोथळे यांचा पोलीस कोठडीत केलेल्या अमानुष मारहाणीत मृत्यू झाल्याप्रकरणी व त्याचा मृतदेह पोलिसांनी जाळून टाकल्या प्रकरणाची चौकशी पूर्ण झाली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त चौकशीत काय आढळून आले व तद्‌नुसार दोषी पोलीस अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.
(२) सदर प्रकरणाच्या चौकशीअंती मयत अनिकेत कोथळे याचा मृत्यू पोलीस अधिकारी/कर्मचारी यांनी केलेल्या मारहाणीमुळे झाल्याचा तसेच त्याचा मृतदेह पोलिसांनी जाळल्याचे निष्पन्न झाले आहे. सदर घटनेत ०५ पोलीस अधिकारी/कर्मचारी आणि दोन खाजगी इसम असे एकूण ७ आरोपी निष्पन्न झाले आहेत. सदर आरोपींविरुध्द भा.दं.वि. कलम ३०२, २०१, २०२, २०३, १२०(ब), ३३०, ३३१, ३२३, ५०४, ५०६(ब) आणि ३४ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. आरोपी लोकसेवक असलेल्या एकूण ०५ दोषी पोलीस अधिकारी/कर्मचारी यांचेविरुध्द ठोस पुरावे प्राप्त झाले असून त्यांना भारतीय राज्यघटनेच्या कलम ३११ अन्वये पोलीस सेवेतून तात्काळ बडतर्फ करण्यात आले आहे.

सदर घटनेतील आरोपी क्र. ०१ ते ०५ पोलीस अधिकारी/कर्मचारी आणि आरोपी क्र. ०६ खाजगी इसम यांना दिनांक ०९/११/२०१७ ते २१/११/२०१७ अखेर व त्यानंतर पुन्हा दिनांक २३/११/२०१७ अखेर पोलीस कोठडी देण्यात आली होती. दिनांक २३/११/२०१७ पासून सदर आरोपी हे आजपर्यंत न्यायालयीन कोठडीमध्ये आहेत. आरोपी क्र. ०७ यास दिनांक ११/१२/२०१७ ते दिनांक २५/१२/२०१७ अखेर पोलीस कोठडी देण्यात आली होती. सदर आरोपी क्र.०७ दिनांक २५/१२/२०१७ पासून अद्यापपर्यंत न्यायालयीन कोठडीत आहे. सदर प्रकरणी घडलेल्या गुन्हयातील उर्वरित ०२ अज्ञात आरोपींचा शोध घेण्यात येत असून सी.आर.पी.सी. १७३ (८) अन्वये तपास सुरु आहे. गुन्हयातील अटक आरोपी असलेल्या ०७ जणांविरुध्द दिनांक ०५/०२/२०१८ रोजी मा.न्यायालयात दोषारोप पत्र दाखल करण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

----------------

## मुंबईतील बेस्ट परिवहन उपक्रम तोट्यात येत असल्याबाबत

**(६२) * ४०१४८ श्री.नागोराव गाणार, प्रा.अनिल सोले, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.प्रविण दरेकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील बेस्ट परिवहन उपक्रम सेवेच्या बसमध्ये वापरण्यात येणाऱ्या ट्रायमाक्स कंपनीच्या मशीनमध्ये बिघाड होत असल्याने लाखो रुपयांचे नुकसान होत असून बस वाहतुक तोट्यात येत असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बेस्ट परिवहन प्रशासनाने प्रवाशांना जुन्याच पध्दतीने तिकीट देण्याचा निर्णय घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) बेस्ट उपक्रमाच्या परिवहन सेवेत वापरण्यात येणाऱ्या ट्रायमॅक्स कंपनीच्या तिकिट वितरण मशीन्समध्ये बिघाड होत आहे, हे खरे आहे.

तथापि, त्यामुळे बेस्ट उपक्रमाचे नुकसान होत आहे, हे खरे नाही.

(२), (३) व (४) सदर प्रकरणी बेस्ट प्रशासनामार्फत खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आली/येत आहे :-

- प्रवाशांना देण्यात येणाऱ्या तिकिट वितरणात अडचणी निर्माण होऊ नयेत याकरिता पारंपारिक तिकिटांचे मुद्रण करण्यात येऊन त्याद्वारे आवश्यकतेनुसार तिकिट वितरण करण्यात येत आहे.
- बिघाड झालेल्या मशीन्स दुरुस्तीबरोबरच नवीन प्रणाली उपलब्ध करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

-----------------

## मिरारोड येथील नगरसेवकाचे समाजकंटकांनी निवासस्थान जाळण्याचा प्रयत्न केल्याबाबत

**(६३) * ४०७४० श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर, श्री.जनार्दन चांदूरकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई उपनगरातील मिरारोड येथे अंमलीपदार्थ विरोधी मोहिम राबवली म्हणून काही समाजकंटकांनी येथील नगरसेवक जुबेर इनामदार यांचे नयानगर मधील मिरास्मृती येथील निवासस्थान जाळण्याचा प्रयत्न केला असल्याचे दिनांक ४ फेब्रुवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या गुन्हयातील दोन व्यक्तींची ओळख पटूनही त्यांना अद्याप अटक करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन गुन्हेगारांना अटक करुन त्यांच्यावर दोषारोपपत्र दाखल करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

सदरची घटना दिनांक ३ फेब्रुवारी, २०१८ रोजी घडली आहे.

(२) सदर गुन्ह्यात एका आरोपीला अटक करण्यात आली असून दुसऱ्या आरोपीचा शोध घेण्यात येत आहे.

(३) सदरहू प्रकरणी नयानगर पोलीस ठाणे, ठाणे ग्रामीण येथे गु.र.क्र. ८५/२०१८ भा.दं.वि.सं. कलम ३०७, ४३६, ४४०, ३४२, ३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याचा तपास सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सोलापूर शहरातील सेव्हन हिल्स रिअ‍ॅलिटी कंपनीने नागरीकांची फसवणूक केल्याबाबत

**(६४) * ४०७०८ प्रा.डॉ.तानाजी सावंत :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर शहरात सेव्हन हिल्स रिअ‍ॅलिटी कंपनीने आपले ऑफिस स्थापन करून पिग्मी योजना, फिक्स डिपॉझीट योजना तसेच पैसे दामदुप्पट करून देणे यासारख्या विविध योजनांचे आमिष दाखवून नागरीकांना हजारो रुपयांची गुंतवणूक करायला लावून त्यांची फसवणूक करण्यात आल्याची बाब माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार दोषीवर कारवाई करून फसवणूक केलेल्या नागरिकांचे पैसे परत मिळण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) होय.

सेव्हन हिल्स रिअ‍ॅलिटी कंपनीने केलेल्या फसवणूकीसंदर्भात फौजदार चावडी पोलीस स्टेशन, सोलापूर शहर येथे गु.र.नं. २०४/२०१७ भा.दं.वि. कलम ४०६, ४०९, ४१७, ४२०, ३४ सह महाराष्ट्र ठेविदारांचे हितसंबंधाचे संरक्षण अधिनियम १९९९ चे कलम ३ व ४ प्रमाणे दिनांक ०७/०४/२०१७ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

गुन्ह्याच्या तपासात सदर कंपनीने सोलापूर शहरातील ठेविदारांना पिग्मी योजना, रिकरिंग डिपॉझिट, फिक्स डिपॉझिट, कल्याण योजना, विद्या योजना, दामदुप्पट योजना, मंथली इन्कम, सुवर्ण योजना अशा ७ प्रकारच्या योजना राबवून गुंतवणूकदारांना आकर्षक परताव्याची हमी दाखवून त्यांची एकूण १,१५,५६,६३७/- इतक्या रक्कमेची फसवणूक केल्याचे अद्याप पावेतो तपासात निष्पन्न झाले आहे. तसेच, सेव्हन हिल्स रिअ‍ॅलिटी कंपनीचे मुख्य कार्यालय मालुर जि.होसुर, कर्नाटक येथे असून सदर कंपनीविरुध्द कर्नाटक

राज्यात १३ गुन्हे, तामिळनाडू राज्यात २ गुन्हे दाखल आहेत. सदर गुन्ह्यातील एकूण १२ आरोपींपैकी कंपनीच्या व्यवस्थापकासह ७ आरोपींना अटक करण्यात आलेली असून इतर आरोपींची माहिती मिळवून त्यांना अटक करण्यावर गुन्ह्याचा तपास चालू आहे.
(३) विलंब झालेला नाही.

-----------------

## एलफिस्टन (मुंबई) येथील पूल दुर्घटनेत मृत्यू पावलेल्या अधिक्षिकेच्या कुटुंबातील व्यक्तिला अनुकंपा तत्वावर सेवेत सामावून घेण्याबाबत

**(६५) * ४०८०६ ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) एलफिस्टन (मुंबई) येथील पुलाच्या दुर्घटनेमध्ये कामगार कल्याण महामंडळातील अधिक्षिका कु.मिना वाल्हेकर यांचा मृत्यू झाला होता, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यांच्या आईने घरातील कर्त्या व्यक्तिचा मृत्यू झाला असल्याने तिच्या पश्च्यात तिचा लहान भाऊ श्री.नितेश वाल्हेकर (अविवाहीत) यांस अनुकंपा तत्त्वावर सामावून घेण्याबाबत सविस्तर प्रस्ताव कामगार कल्याण मंडळ (एलफिस्टन, मुंबई) यांना सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, लोकप्रतिनिधींनी देखील श्री.नितेश वाल्हेकर यांना अनुकंपा तत्वावर सामावून घेण्याबाबत दिलेल्या पत्रान्वये मा.कामगार मंत्री यांनी सदर प्रस्ताव मंजूर करण्याबाबत विनंती केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार सदर कुटुंबातील व्यक्तिला अनुकंपा तत्वावर सेवेत सामावून घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संभाजी पाटील-निलंगेकर :** (१) व (२) होय.

(३) मा.लोकप्रतिनिधी यांच्या पत्राच्या अनुषंगाने प्रकरण तपासून सादर करण्याचे निदेश देण्यात आले आहेत.

(४) व (५) अनुकंपा नियुक्ती संदर्भातील सर्व कागदपत्रे तपासून नियुक्ती प्राधिकारी म्हणून त्यांचेस्तरावर निर्णय घेण्याबाबत सूचना कल्याण आयुक्त यांना दिनांक १६/०२/२०१८ च्या पत्रान्वये देण्यात आल्या आहेत.

-----------------

## नांदेड शहराला नियमित पाणीपुरवठा करण्याबाबत

**(६६) * ४०९४१ श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड शहरातील मुख्य जलवाहिन्यांना वारंवार गळती लागत असल्याने पाणीपुरवठा बंद असून तीव्र पाणीटंचाई निर्माण होत असल्याने नागरिकांमध्ये असंतोष पसरला असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुख्य जलवाहिनीची दुरुस्ती करण्याबाबत व शहराचा पाणीपुरवठा नियमित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

नांदेड शहरातील मुख्य जलवाहिन्यांना वारंवार गळती लागून पाणीपुरवठा बंद झाल्याची अथवा पाणी टंचाई निर्माण झाल्याची बाब निर्दशनास आली नसल्याचे नांदेड वाघाळा महानगरपालिकेने कळविले आहे.

(२) मुख्य जलवाहिनीची नियमित देखभाल व दुरुस्ती करण्यात येत असून शहरातील नागरिकांना नियमित पाणीपुरवठा केला जात असल्याचे महानगरपालिकेने कळविलेले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील मलनि:सारण वाहिन्यांच्या देखभाल खर्चाबाबत

**(६७) * ३८८३८ श्रीमती विद्या चव्हाण, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.रामनिवास सिंह, श्रीमती स्मिता वाघ :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील मलनि:सारण वाहिन्यांची सफाई करण्यासाठी दोन कंपन्यांना सुमारे पावणे दोन कोटी रुपये खर्च करून वाहनांवर बसविण्यात आलेल्या सात सक्शन मशीन खरेदी करण्याचा निर्णय मुंबई महानगरपालिकेने घेतला असल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मशीनच्या पुढील आठ वर्ष देखभालीसाठी अंदाजे रुपये ४० कोटी खर्च करण्यात येणार असल्याने अशा प्रकारे कमी किंमतीत खरेदी केलेल्या मशीन्सच्या देखभालीवर दुपटीने खर्च करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत दोषी आढळून आलेल्यांवर काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) मुंबईतील मलनि:सारण वाहिन्यांची सफाई करण्यासाठी, मुंबई शहराकरीता ४ व पूर्व उपनगराकरीता ३ अशा रुपये १.७२ कोटी किंमतीच्या एकूण ७ सक्शन मशीनची खरेदी ई-निविदा प्रक्रियेद्वारे करण्यासाठी महानगरपालिकेमार्फत माहे फेब्रुवारी, २०१८ मध्ये कार्यादेश देण्यात आले आहेत.

(२), (३) व (४) सदर ७ मशीनच्या प्रचालन व सर्वसमावेक्षक परिरक्षणाकरीता पुढील ८ वर्षामध्ये रुपये ३२ कोटी इतका खर्च येणार असून यामध्ये, यंत्राच्या प्रचलनाकरीता लागणाऱ्या कर्मचारी वर्गाचा वेतन खर्च, डिझेलचा खर्च, यंत्राच्या दुरुस्तीकरीता लागणाऱ्या सुट्टया भागाचा खर्च तसेच इतर साहित्य व उपकरणे आणि सुरक्षततेची साधने, इत्यादींकरीता लागणाऱ्या खर्चाचा अंतर्भाव आहे.

-----------------

## मुंबईतील गोरगांव येथील सेंट जॉन्स युनिव्हर्सल शाळेच्या इमारतीवरील टॉवर निष्कासित करण्याबाबत

**(६८) * ३९२८५ श्री.नरेंद्र पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.अनिल भोसले, श्री.जयवंतराव जाधव, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती विद्या चव्हाण, ॲड.राहुल नार्वेकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत नागरी वस्ती, शाळा, महाविद्यालय तसेच अन्य वर्दळीच्या ठिकाणी मोबाईल टॉवरच्या रेडियशनमुळे नागरिकांना आजार होत असल्यामुळे मोबाईल टॉवर उभारण्यास बंदी आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गोरेगाव येथील सेंट जॉन्स युनिव्हर्सल या इंग्रजी माध्यमाच्या शाळेच्या इमारतीवर २० मोबाईल टॉवर उभारले असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार सदर इमारतीवर उभारण्यात आलेले मोबाईल टॉवर काढणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) मोबाईल टॉवरच्या रेडिएशनबाबत तक्रारी व त्याची अंमलबजावणी न करणाऱ्या कंपन्यावर कारवाई करण्याची जबाबदारी ही भारत सरकारच्या दूरसंचार विभागाच्या दूरसंचार अंमलबजावणी संसाधन व देखरेख कक्ष यांच्या अखत्यारित येते. नागरिकांना दूरसंचार विभागाच्या संकेतस्थळावर यासंदर्भातील तक्रारी नोंदविण्याची मुभा आहे.

राज्य शासनाकडील दिनांक ०४/०३/२०१४ रोजीच्या अधिसूचनेनुसार राज्यातील नियोजन प्राधिकरणांच्या विकास नियंत्रण नियमावलीमध्ये अंतर्भूत करणेत आलेल्या विनियमामध्ये शाळा, कॉलेज आणि रुग्णालये या इमारतींवर मोबाईल टॉवर उभारणे अनुज्ञेय होत नसले तरी यासंदर्भात केंद्र शासनाकडील मार्गदर्शक तत्त्वाप्रमाणे (दिनांक ०१/०८/२०१३) कार्यवाही करणेचे मा.उच्च न्यायालयाचे आदेश असून राज्यातील नियोजन प्राधिकरणांना मोबाईल टॉवरवर कठोर कारवाई करु नये, असे अंतरिम आदेश आहेत.

केंद्र शासनाच्या मोबाईल टॉवरसंदर्भातील मार्गदर्शक तत्वे विचारात घेवून शासनाकडील माहिती तंत्रज्ञान विभागाने दिनांक १७/०२/२०१८ रोजी टेलिकॉम इन्फ्रास्ट्रक्चर धोरण जाहिर केलेले आहे. त्यानुसार राज्य शासनाचे विभाग, नागरी तसेच ग्रामीण भागातील स्थानिक स्वराज्य संस्था, राज्य शासनाच्या सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम राबविणाऱ्या यंत्रणा व संस्था यांनी ज्या इमारतींवर मोबाईल टॉवर उभारता येणे शक्य आहे व ज्या ठिकाणी असे मोबाईल टॉवर उभारता येणे शक्य नाही याबाबतची यादी दोन महिन्यात संचालक, माहिती व तंत्रज्ञान विभाग यांना सादर करणे आवश्यक आहे.

(२) न.भू.क्र. १५९, पहाडी गोरेगांव व्हिलेज, गोरेगांव (प.) येथील "सेंट जॉन्स युनिर्व्हसल स्कूल" या शाळेच्या इमारतीवर दिनांक १०/११/२००३ रोजी महानगरपालिकेने परवानगी दिलेली होती. सदरच्या परवानगीचे दिनांक ३१/०३/२०१२ पर्यंत नूतनीकरण करण्यात आलेले होते. सद्य:स्थितीत सदर प्रकरण (रिट याचिका क्र. ६८०२/२०१३) न्यायप्रविष्ट आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्य शासनाने केलेली न्यायालयीन शुल्क वाढ रद्द करण्याबाबत

**(६९) * ४०५८६ ॲड.जयदेव गायकवाड, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.संजय दत्त** : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने सर्वच स्तरावरील न्यायालयातील विविध बाबींसाठी आकारल्या जाणाऱ्या शुल्कात वाढ करण्याचा निर्णय घेतल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ही शुल्कवाढ गोरगरिबांना न्यायदानापासून वंचित ठेवणारी असल्याने सदरील निर्णयाला स्थगिती देण्याची मागणी होत असून वकील संघटनाकडून त्यास विरोध होत असल्याचे माहे फेब्रुवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार उपरोक्त शुल्कवाढ रद्द करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, सदरील निर्णयाला स्थगिती देण्याची मागणी होत असून वकील संघटनाकडून त्यास विरोध होत असल्याचे माहे फेब्रुवारी, २०१८ मध्ये निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे. सदर शुल्कवाढीच्या विरोधात औरंगाबाद वकील संघटनेने मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट याचिका (स्टॅम्प) क्र.२३०३/२०१८, दाखल केली आहे.

(३) महाराष्ट्र विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांनी महाराष्ट्र न्यायालय फी (सुधारणा) अधिनियम, २०१७ संमत केला असून त्यास मा.राज्यपालांनी मंजुरी दिली आहे. त्यामुळे यामध्ये वेगळी चौकशी करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. सदर अधिनियमाच्या कलम १(२) अन्वये अधिनियम अंमलात आणण्याबाबतची अधिसूचना अद्‌याप निर्गमित करण्यात आलेली नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील सागरी किनारा मार्गाचे काम सुरु करण्याबाबत

**(७०) * ३९७५६ श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर : तारांकित प्रश्न क्रमांक ३४६७१ ला दिनांक २० डिसेंबर, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील नरिमन पॉईंट ते कांदिवली दरम्यानच्या सागरी किनारा मार्गास पर्यावरण विभागाने मंजूरी देऊनही सदर मार्गाचे काम सुरु झाले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बांद्रा ते कांदिवली जंक्शन लिंक रोडच्या सागरी मार्गास केंद्रिय पर्यावरण विभागाची परवानगी मिळाली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्य शासनाने पर्यावरण विभागाची परवानगी मिळण्याच्या संदर्भात केंद्र शासनाकडे कोणता पाठपुरावा केला आहे,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून सदरील सागरी मार्गाचे काम सुरु करण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) प्रस्तावित नरिमन पॉईंट ते कांदिवली या सागरी मार्गाची प्रिन्सेंस स्ट्रीट फ्लायओव्हर ते वरळी (end of Sea Link) भाग-अे व बांद्रा (end of Sea Link) ते कांदिवली जंक्शन लिंक रोड भाग-बी या दोन भागामध्ये विभागणी करण्यात आलेली असून भाग-अे संदर्भात पर्यावरण विभागाची मान्यता प्राप्त झालेली आहे. महानगरपालिकेकडून निविदा प्रक्रिया अंतिम टप्प्यात असून माहे मे, २०१८ मध्ये काम सुरु करण्याचे प्रस्तावित आहे.

(२) ते (५) बांद्रा (end of Sea Link) ते कांदिवली जंक्शन लिंक रोड भाग-बी संदर्भात बांद्रा ते वर्सोवा पर्यंत सागरी सेतू बांधणेचा प्रस्ताव महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत प्रस्तावित आहे. सदर कामास पर्यावरण विभागाची मान्यता प्राप्त आहे. त्याचप्रमाणे महामंडळाकडून निविदा मागविणेत आलेल्या असून निविदा प्राप्त आहेत. लवकरच कार्यारंभ आदेश देण्यात येणार आहेत.

-----------------

## मुळशी व पौड (जि.पुणे) येथील जमीन नियमबाह्य व्रिकी केल्याबाबत

**(७१) * ३९९९५ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुळशी व पौड (जि.पुणे) येथील दोन दुय्यम निबंधक यांनी इनफोर्समेंट डायरेक्टरेट डिपार्टमेंड (ईडी) यांनी जप्त केलेली सर्व्हे नं. २२०, हिस्सा क्र. १ व ५/५ येथील ०.८३ हेक्टर जमीन नियमबाह्य परस्पर विकली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जमिनीची निबंधक कार्यालयात रजिस्टर नोंद असतानाही हिंदवी स्वराज्य ट्रेडींग प्रा. लि. चे संचालक प्रविण गुरव यांनी उत्कर्ष हा गृहप्रकल्प बांधला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन गैरव्यवहार करणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) होय, हे खरे आहे.

हिंजवडी, तालुका मुळशी, जिल्हा पुणे येथील सर्व्हे नंबर २२०, हिस्सा नंबर १ व ५/५ मधील ०-८३ हेक्टर मिळकत अंमलबजावणी संचालनालयाने (इनफोर्समेंट डायरेक्टरेट) जप्त केलेली आहे हे माहित असून सुध्दा आरोपींनी दुय्यम निबंधक कार्यालय मुळशी २ व दुय्यम निबंधक कार्यालय, पौड, मुळशी २ यांचेशी संगनमत करून स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता सदरची मिळकत दोन वेळा दोन वेगवेगळ्या दुय्यम निबंधक कार्यालयामध्ये नोंदणी करून विकली आहे. सदर मिळकतीवर हिंदवी स्वराज्य कॉर्पोरेशन प्रा. लि. कंपनी व त्या कंपनीचे डायरेक्टर याने नमूद मिळकत ही ई.डी. ने जप्त केलेली आहे हे माहित असतानाही सदर मिळकतीवर तीन इमारती बांधून त्यामधील सदनिका ग्राहकांना विकून ग्राहकांची व शासनाची फसवणूक केली आहे, अशा तक्रारीवरून हिंजवडी पोलीस स्टेशन येथे ६ आरोपी साहील रिअॅल्टर्स व हिंदवी स्वराज्य कॉर्पोरेशन प्रा.ली. यांचेविरूध्द गुन्हा क्र. ३०/२०१८ भा.दं.वि. कलम ४२०, ४०६, ३४ सह लाच लुचपत प्रतिबंधक कायदा १९८८ चे कलम १३ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्हा तपासावर आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई पश्चिम उपनगरातील झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प प्रलंबित असल्याबाबत

**(७२) * ३९३४६ श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, अॅड.राहुल नार्वेकर, श्री.जयवंतराव जाधव, अॅड.निरंजन डावखरे : तारांकित प्रश्न क्रमांक ३५९१९ ला दिनांक २० डिसेंबर, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई पश्चिम उपनगरातील दहिसर-शिवाजीनगर, शांतीनगर, जीवा भरडवाल चाळ, बोरीवली-सुकरवाडी, राजेंद्रनगर, कांदिवली-वडारपाडा, नरसीपाडा, हनुमाननगर, समर्थवाडी, गोरेगांव-संतोषनगर, खडकपाडा व जयभीमनगर येथील झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प विकासकांकडून गत १५ वर्षापासून प्रलंबित ठेवल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अपूर्ण प्रकल्प प्रलंबित ठेवून लोकांना वेठीस धरुन नंतर सदर प्रकल्प इतर विकासकांना कोट्यवधी रुपयांना विकले जात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार प्रकल्प अपूर्ण ठेवणाऱ्या विकासकांवर काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश महेता :** (१), (२) व (३) प्रश्नांकित नमूद योजना प्रलंबित आहेत ही वस्तुस्थिती आहे. बोरीवली राजेंद्र कुंज सह. गृह. संस्था मौजे मागाठाणे येथील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेला सह विकासक नेमण्याची परवानगी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने दिली आहे. प्रश्नांकित उर्वरित इतर कोणत्याही योजनांमध्ये विकासक बदलण्याची बाब झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या अभिलेखात नमूद नाही. परिशिष्ट-२ प्राप्त न होणे, ए.सी.बी.द्वारे चौकशी चालू असणे अशा कारणास्तव प्रश्नांकित नमूद योजना प्रलंबित आहेत. झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाद्वारे सदर योजना कार्यान्वित होण्यासाठी विविध उपाययोजना करण्यात येत आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागपूर येथील पोलीस शिपायाने एका महिलेवर बलात्कार केल्याबाबत

**(७३) * ३९२६१ श्री.धनंजय मुंडे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.अमरसिंह पंडित, ॲड.निरंजन डावखरे, श्री.किरण पावसकर, ॲड.राहुल नार्वेकर** : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर शहर पोलीस दलातील पोलीस शिपाई रवी जाधव याने पोलीस गणवेशात बंदुकीचा धाक दाखवून एका महिलेवर बलात्कार केल्याची घटना दिनांक १४ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून आरोपीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) सदर घटना दिनांक १३/१/२०१८ रोजी उघडकीस आली आहे. त्यावेळी कर्मचारी पोलीस गणवेशात नव्हता.
(२) फिर्यादीने दिलेल्या तक्रारीवरून सोनेगाव पोलीस स्टेशन नागपूर येथे अप क्र. १६/१८ कलम ३७६, ३२३, ४५२, ५०६(ब) भा.द.वि. सह कलम ३(२५) भारतीय हत्यार कायदा सहकलम ३(१)(१२) अनुसूचित जाती जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदा १९८९ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर गुन्ह्यात आरोपीस अटक करून त्याचे कडील पिस्टल व राऊंड जप्त करण्यात आलेले आहे. आरोपी सद्य:स्थितीत मध्यवर्ती कारागृहात असून त्याचेविरूध्द मा.न्यायालयात दोषारोपपत्र पाठविण्याची तजविज ठेवण्यात आलेली आहे.

संबधित कर्मचारी यांना दिनांक १५/१/२०१८ रोजी सेवेतून निलंबित केले असून शिस्तभंगविषयक कारवाई करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कल्याण (जि.ठाणे) येथील रुक्मिणीबाई रुग्णालयातील नवजात बालकाच्या मृत्यूबाबत

**(७४) * ४०२८४ श्री.परिणय फुके :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कल्याण (जि.ठाणे) येथील रुक्मिणीबाई रुग्णालयात प्रसूतीसाठी दाखल करण्यात आलेल्या महिलेचे बाळ डॉक्टर उपलब्ध नसल्याने दगावले असून रुग्णालयाचा बेजबाबदारपणा माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रुग्णालयात उपचार घेत असलेल्या गरोदर महिलेला देण्यात आलेल्या गोळ्यांमध्ये तारा होत्या, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने दोषींवर व ज्या कंपनीने गोळ्या व औषधे पुरविली आहेत त्यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) दिनांक १३/१०/२०१७ रोजी कल्याण येथील रूक्मिणीबाई रूग्णालयात प्रसूतीसाठी दाखल झालेल्या महिलेस मृत बाळ जन्माला आले, हे खरे आहे. तथापि, सदर घटना रूग्णालयाच्या बेजबाबदारपणामुळे घडली, हे खरे नाही.
(२) सदर विषयाबाबत गटनेता, श्री.प्रकाश भोईर यांनी दिनांक ०४/१०/२०१७ रोजी महानगरपालिकेत लक्षवेधी उपस्थित केली होती, तसेच याबाबत दिनांक ०४/१०/२०१७ च्या "महाराष्ट्र टाईम्स" या वृत्तपत्रात बातमीही प्रसिध्द झाली होती.
(३) कल्याण (जि.ठाणे) येथील रूक्मिणीबाई रूग्णालयात प्रसूतीसाठी दाखल झालेल्या गरोदर महिलेचे बाळ मृत जन्मास आल्याने या प्रकरणी महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागामार्फत पाच सदस्यीय चौकशी समिती गठित केली.

- सदर समितीने केलेल्या प्राथमिक चौकशीत त्यावेळी कार्यरत ऑन ड्युटी "स्त्रीरोग व प्रसूतीतज्ञ" व "स्टाफ नर्स" यांचा काहीही दोष नसल्याचे निष्पन्न झाले आहे.
- रूग्णालयात उपचार घेत असलेल्या गरोदर महिलेला देण्यात आलेल्या गोळ्यांमध्ये तारा असल्याबाबत संबंधित महिलेने महानगरपालिकेकडे कोणतीही लेखी तक्रार केलेली नाही.
- तथापि, याबाबत वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या बातमीच्या अनुषंगाने महानगरपालिकेमार्फत सदर औषध समुहाचे नमुने पुढील योग्य त्या तपासणीकरिता अन्न व औषध प्रशासन, ठाणे यांच्याकडे दिनांक ०४/१०/२०१७ रोजी पाठविण्यात आलेले आहेत. याबाबतचा अहवाल अद्याप अप्राप्त आहे.
- सदर औषधाच्या समूह क्रमांकाच्या सर्व औषध साठ्याचा वापर तात्काळ थांबविण्यात आलेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## ठाणे जिल्ह्यात अंमलीपदार्थाच्या विक्रीस आळा घालण्याबाबत

**(७५) * ३७९९१ ॲड.अनिल परब, श्री.जगन्नाथ शिंदे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.आनंद ठाकूर, श्री.धनंजय मुंडे** : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे पोलिसांनी दिनांक ७ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास इंदोर येथून एफेड्रिन (एमडी पावडर) या अंमलीपदार्थाची विक्री करण्यासाठी आलेल्या दोघांना अटक करुन त्यांच्याकडून ८२२ ग्रॅम एमडी पावडर जप्त केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून तदनुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, कल्याण पूर्वेतील कोळसेवाडी व अंबरनाथ येथील तरुणाई अंमलीपदार्थाच्या विळख्यात अडकत असल्याबाबतची तक्रार स्थानिक लोकप्रतिनिधींनी अंबरनाथ पोलीस ठाणे येथे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान तसेच पोलीस आयुक्त, ठाणे यांच्याकडे दिनांक १० जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू तक्रारीमध्ये कल्याण (पूर्व) “ड” प्रभाग क्षेत्र कार्यालयाचा परिसर, स्वामी समर्थ मठ, साकेत कॉलेज रोड, मॉडेल कॉलेज रोड, गॅस कंपनीचा परिसर तर अंबरनाथ पश्चिम मधील चिंचपाडा कोढेजगाव, फुलेनगर, कमलाकर नगर, बुवापाडा, स्टेशन परिसर या ठिकाणी अनेक तरुण अंमली पदार्थाचे सेवन करत असल्याचे व या दोन्ही शहरात अंमलीपदार्थाची मोठ्या प्रमाणात विक्री केली जात असल्याचे नमूद करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तदनुसार अंमलीपदार्थाच्या विक्रीस आळा घालण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय हे खरे आहे.

दिनांक ०३/०१/२०१८ रोजी ठाणे गुन्हा शाखा वागळे युनिट-५ ने सापळा लावून आरोपीत अक्रम असलम खान याचेकडून रुपये १६,४४,०००/- किंमतीचे ८२२ ग्रॅम वजनाचे मेफेड्रॉन (एम डी) पावडर अंमली पदार्थ, जप्त करुन त्यास अटक केली. तसेच या प्रकरणी दिनांक ०६/०१/२०११ रोजी आरोपीत रईसउद्दिन सल्लाउद्दीन शेख व अजय सुरजसिंग जादौन यांना अटक करण्यात आली आहे.

(२) सदर प्रकरणी अंमली पदार्थ जप्त करण्यात आला असून वागळे ईस्टेट पोलीस स्टेशन येथे गु.रजि.नं. ०३/२०१८ एन.डी.पी.एस. ॲक्ट कलम ८(क), २२, २९ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हयाचा पुढील तपास चालू आहे.

(३) कोळसेवाडी पो.ठाणे हद्दीत कोणत्याही प्रकारची तक्रार दाखल नाही. तथापि अंबरनाथ पोलीस ठाणे येथे दिनांक ०४/१२/२०१७ रोजी स्थानिक नगरसेवक यांना त्या भागात वारंवार होत असलेली चोरी व अंमली पदार्थांची विक्री करणाऱ्यावर कारवाई करणे बाबत तक्रार अर्ज दिलेला आहे.

तसेच मा.श्री.जगन्नाथ सखाराम शिंदे, विधान परिषद सदस्य यांनी कल्याण पूर्व परिसरातील वाढती गुन्हेगारी व अंमली पदार्थांच्या वाढत्या व्यवसायाबाबत पोलीस आयुक्त ठाणे शहर यांच्याकडे तक्रार अर्ज दिला आहे. सदरचा अर्ज पोलीस आयुक्त कार्यालय यांनी दिनांक ०६/०१/२०१८ अन्वये पोलीस उप आयुक्त परिमंडळ-३ कल्याण यांच्याकडे पुढील चौकशीकामी पाठविला असून, पुढील चौकशी सहा. पोलीस आयुक्त, कल्याण विभाग हे करीत आहे. सदर हद्दीतील तरुणाई अंमली पदार्थांच्या विळख्यात अडकत असल्याबाबत निदर्शनास आलेले नाही.

(४) या भागातील तरुण अंमली पदार्थांचे सेवन करीत असल्याचे व शहरात अंमली पदार्थांची मोठ्या प्रमाणात विक्री केल्याचे निदर्शनास आलेले नाही.

तथापि सन २०१७ मध्ये आपले कब्जात गांजा हा अंमली पदार्थ बाळगला म्हणून अंबरनाथ पोलीस ठाणे येथे ३ गुन्हे दाखल असून अंमली पदार्थांचे (गांजा) सेवन करत असताना मिळुन आला म्हणून १ गुन्हा दाखल असून सदर सर्व आरोपीतांविरुध्द मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल झालेले आहे.

(५) सर्व आरोपीतांविरुध्द मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल झालेले आहे. अंमली पदार्थ विक्री व सेवन यास आळा घालण्याच्यादृष्टीने केलेल्या उपाययोजना :-

१. अंमली पदार्थांची तस्करी/विक्री करणारे इसमांविरुध्द एनडीपीएस कायदयान्वये नियमित कारवाई करण्यात येते.
२. अंमली पदार्थांचे सेवन व त्याचे दुष्परिणाम या विषयी समाजामध्ये विशेषत: तरुणांमध्ये जनजागृती करण्याकरीता शाळा/ कॉलेज इत्यादी मध्ये सामाजिक संस्थेच्या मदतीने मार्गदर्शन शिबीर आयोजित केले जाते. तसेच झोपडपट्टी परिसरामध्ये रॅली, पथनाटये इत्यादी द्वारे कार्य करण्यात येते.
३. अंमली पदार्थांच्या आहारी गेलेल्या व्यक्तींना त्यांचे पालकाच्या मदतीने पुनर्वसन केंद्रात दाखल करणे याबाबत कार्यवाही करण्यात येते.
४. महाराष्ट्र शासन जिल्हा विधी सेवा प्राधिकरण ठाणे यांचे मार्गदर्शनाखाली तरुणांमध्ये जनजागृती करुन अंमली पदार्थ पिडीत व्यक्तींना विधी सेवा व अंमली पदार्थांचे निर्मुलन योजना २०१५ अंतर्गत कायदयाविषयक साक्षरता शिबीर आयोजित करुन मार्गदर्शन केले जाते.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## परळी वैजनाथ (जि.बीड) ग्रामीण पोलीस ठाणे अंतर्गत झालेल्या अपघाताबाबत

**(७६) * ४०७९३ श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परळी वैजनाथ (जि.बीड) ग्रामीण पोलीस ठाणे अंतर्गत मिरवट मांडवा गावाजवळ दिनांक १४ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास अपघात झाला त्यात श्रीकृष्ण व्यंकटी उबाळे गंभीर जखमी झाले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या अपघातातील आरोपी मोतीराम संभाजी चाटे, मु.हाडोळी (ता.चाकूर, जि.लातूर) यांच्यावर गुन्हा दाखल करणे अपेक्षित असताना गंभीर जखमी श्रीकृष्ण व्यंकटी उबाळे यांच्यावरच स्थानिक पोलीस प्रशासनाने गु.र.नं ८५/२०१७ आयपीसी २७९, ३३७, ३३८, ४२७ हा खोटा गुन्हा दाखल कला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरील गुन्हा मागे घेण्याबाबत व परळी येथील पोलीस उपनिरीक्षक श्री.चाटे, पोलीस श्री.जाधवर यांना निलंबित करुन त्यांची विशेष पोलीस महानिरीक्षक, पोलीस परीक्षेत्र, औरंगाबाद यांच्यामार्फत विभागीय चौकशी करण्यात यावी याबाबत सदर जखमीच्या पत्नी श्रीमती मीरा उबाळे यांनी मा.मुख्यमंत्री यांना दिनांक ६ फेब्रुवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या निवेदनाची दखल घेऊन शासनाने त्या अनुषंगाने श्रीकृष्ण व्यंकटी उबाळे यांच्यावरील गुन्हे मागे घेण्यासोबतच परळी पोलीस ठाण्याचे उपनिरीक्षक श्री.चाटे व वाघाळयाचे तत्कालीन बीट अंमलदार श्री.जाधवर यांच्यावर व अपघात घडवून आणणारे श्री.मोतीलाल चाटे यांच्यावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही. दिनांक १४/०१/२०१६ रोजी मोटारसायकल चालक श्रीकृष्ण उबाळे व दुसरे मोटारसायकल चालक श्री.मोतीराम चाटे यांनी त्यांच्या मोटारसायकली निष्काळजीपणे व भरवेगात चालवून एकमेकास गंभीर जखमी केल्याचे एकंदर चौकशीत निष्पन्न झाले आहे. त्यामुळे दोन्ही मोटारसायकल चालकांवर पोलीस स्टेशन, परळी ग्रामीण येथे गु.र.क्र. ८५/२०१७, भा.दं.वि. कलम २७९, ३३७, ३३८ व ४२७ अन्वये गुन्हा नोंदविला आहे.

(३) हे खरे आहे.

(४) श्रीमती उबाळे यांनी त्यांच्या निवेदनात नमूद केलेल्या विनंतीच्या अनुषंगाने पुढील आवश्यक कार्यवाही करण्याच्या सूचना पोलीस महासंचालक यांना देण्यात आलेल्या आहेत.

सहायक फौजदार श्री.जाधवर, पो.स्टे. परळी ग्रामीण यांनी गुन्हा दाखल करण्यास विलंब केल्याने त्यांना कसूरीबाबत देय वार्षिक वेतनवाढ दोन वर्षे (परिणामाशिवाय) स्थगित करण्याची शिक्षा पोलीस अधिक्षक, बीड यांनी प्रस्तावित केली होती. श्री.जाधवर यांच्या खुलाशाअंती त्यांना देय असलेली वार्षिक वेतनवाढ एक वर्ष (परिणामा शिवाय) स्थगित करण्याची शिक्षा देण्यात आली आहे.

तपासात निष्पन्न झाल्याप्रमाणे आरोपी श्री.मोतीराम चाटे यांना सदर गुन्हयात अटक करुन दिनांक ३१/०३/२०१७ रोजी मा.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांच्या आदेशान्वये दिनांक १३/०४/२०१७ पर्यंत न्यायालयीन कोठडी मंजूर केली होती.

(५) विलंब झालेला नाही.

मा.न्यायालयात दिनांक ०३/१०/२०१७ रोजी दोषारोपपत्र दाखल केले आहे.

-----------------

## पुणे शहरातील पीएमपीच्या ठेकेदारांकडील बसेसचे पासिंग झाले नसल्याबाबत

**(७७) * ३८७९७ श्री.अनिल भोसले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील पीएमपीच्या ठेकेदारांकडील ७७ बसचे प्रादेशिक परिवहन कार्यालयात पासिंग झालेले नसतानाही या गाडया रस्त्यावर धावत असल्याची बाब माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यातील तीन बसगाडयांचा हडपसर व सुखसागर नगर येथे अपघात झाल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार विनापासिंग बसेस चालविणाऱ्या ठेकेदारांवर व याकडे दुर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३)

- पुणे महानगर परिवहन महामंडळाकडे सद्य:स्थितीत एकूण ६५३ भाडेतत्वावरील बसेस संचलनात आहेत.
- ठेकेदारांशी केलेल्या करारातील अटी व मोटर व्हेईकल अधिनियमातील तरतूदीनुसार सर्व बाबींची पूर्तता करणे ठेकेदारास बंधनकारक आहे.
- आरटीओ पासिंग केल्याशिवाय कोणत्याही बसला संचलनामध्ये आणण्यास पीएमपीएमएलकडून परवानगी देण्यात येत नाही. त्यामुळे आरटीओ पासिंग केल्याशिवाय बस रस्त्यावर धावतात अशी वस्तुस्थिती नाही असे पीएमपीएमएलने कळविलेले आहे.
- नोव्हेंबर, २०१७ मध्ये बस क्र. आर-२८ या बसला हडपसर येथे व बस क्र.आर-१५० या बसला सुखसागर नगर येथे अपघात झालेले आहेत ही वस्तुस्थिती आहे. तथापि, सदर बसेसचे आरटीओ पासिंग झालेले आहे.
- बस क्र.आर-२८ व बस क्र.आर-१५० या दोन्ही बसच्या चालकांविरूध्द गुन्हे दाखल करण्यात आले असून त्यांना अटक करण्यात आलेली आहे. तसेच सदर बस चालकांना कामावरून त्वरित कमी करण्यात आले आहे.
- संबंधित ठेकेदारांविरूध्द दंडात्मक कारवाई करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मेसर्स काशी एज्युकेशन ट्रस्ट, मानपाडा (ठाणे) येथील शैक्षणिक संस्थेत अपहार झाल्याबाबत

**(७८) * ४०४९१ श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मेसर्स काशी एज्युकेशन ट्रस्ट, मानपाडा (ठाणे) या शैक्षणिक संस्थेत काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या भविष्य निर्वाह निधीत अपहार केल्याप्रकरणी संस्थेच्या तीन संचालकांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माहे ऑगस्ट ते डिसेंबर, २०१७ या कालावधीत रुपये ८३.४२० इतक्या रकमेचा अपहार झाला असून कोणालाही अटक करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार यास जबाबदार असणाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) होय, हे खरे आहे

सदर गुन्हयातील आरोपीनां मा.सत्र न्यायालय, ठाणे यांनी अंतरिम जामीन मंजूर केला आहे.

(३) सदर प्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन कापुरबावडी पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. १५/१८, भा.दं.वि. कलम ४०६, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून सदर गुन्हा तपासाधिन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## माझगाव (मुंबई) येथील तुळशीदास गोपालजी चॅरिटेबल आणि ढाकलेश्वर मंदिर ट्रस्टच्या विश्वस्थांनी गैरव्यवहार केल्याबाबत

**(७९) * ४०५९५ श्री.जनार्दन चांदूरकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माझगाव (मुंबई) येथील तुळशीवाडी रोड येथे तुळशीदास गोपालजी चॅरिटेबल आणि ढाकलेश्वर मंदिर ट्रस्टच्या जागेवर स्थावर, जंगम व किरकोळ प्रकारचे अनेक गैरव्यवहार रावजी प्रेमजी आणि कुवरजी प्रेमजी या विश्वस्थांनी केले असल्याचे निवेदन दिनांक ४ मे, २०११ रोजी वा त्यासुमारास तत्कालीन मा.मुख्यमंत्री यांचेकडे स्थानिक नागरीकांनी व लोकप्रतिनिधींनी दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनाची दखल घेऊन शासनाने चौकशी करून संबंधित विश्वस्थांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

दिनांक ४ मे, २०११ रोजी या विषयीचे निवेदन तत्कालीन मा.मुख्यमंत्री यांच्याकडे स्थानिक नागरीकांनी दिलेले आहे. तथापि, सदर निवेदनात रावजी प्रेमजी आणि कुवरजी प्रेमजी यांच्या नावाचा उल्लेख नाही.

(२) सदर निवेदनाच्या अनुषंगाने दिनांक ०३/०१/२०१२ रोजी निरीक्षक अहवाल सादर करण्यात आला. सदर अहवालात धर्मादाय उपआयुक्त यांनी तक्रारदारांचे म्हणणे ऐकून घ्यावे, असा आदेश दिला होता. तक्रारदार यांचा जबाब अद्याप प्रलंबित आहे. या न्यासाविरुध्द अर्ज क्र.५/२०१० कलम ३६ (२) हे न्यायप्रविष्ठ आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## ठाणे जिल्हयात लहान मुलांचे अपहरण व बाळ चोरी करणारी टोळी सक्रीय झाल्याबाबत

**(८०) * ३९६८६ श्री.रविंद्र फाटक :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्हयात लहान मुलांचे अपहरण व बाळ चोरी करणारी टोळी सक्रीय झाली असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सिव्हील शासकीय रुग्णालयातून (जि.ठाणे) दिनांक १४ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास बाळ चोरीला गेल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार लहान बाळांची चोरी करणाऱ्या टोळीला पकडण्याबाबत काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबनाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

(२) होय, हे खरे आहे.

(३) प्रस्तुत प्रकरणी पोलीस उपायुक्त परिमंडळ-१, ठाणेनगर पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. १०/२०१८ भा.दं.वि. कलम ३६३, ३०८, ३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यात ३ आरोपींना अटक करण्यात आली असून सद्य:स्थितीत गुन्ह्याचा तपास सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नाशिक शहरात विविध गुन्ह्यांमध्ये वाढ झाल्याबाबत

**(८१) * ३९४६९ डॉ.अपूर्व हिरे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक शहरात खून, जबरी चोऱ्या, दुचाकी चोरी, घरफोडया, चेन स्नॅचिंग व जीवघेणे हल्ले इत्यादी गुन्हयांमध्ये वाढ झाल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नाशिकच्या सिडको भागात तसेच राजीवनगर झोपडपट्टीजवळ एकाच रात्रीत दिनांक २७ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास तीन खूनाच्या घटना घडल्या तर शहरातील महात्मा नगर भागात एका इमारतीत दिवसा २० लाख रुपयांची घरफोडीची घटना घडली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शहरात तोतया पोलीस फिरत असून एकाच दिवसात घडलेल्या दोन घटनांमध्ये तीन वृध्दांना दोघा अज्ञातांनी पोलीस असल्याची बतावणी करून १ लाख ४२ हजार रुपयांना फसविल्याचे दिनांक ८ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शहरात मोटरसायकल चोरी तसेच विविध प्रकारच्या गंभीर गुन्ह्यांमध्ये वाढ झाल्याने नागरिकांना असुरक्षितता वाटत असल्याने गुन्ह्यांना आळा घालण्याच्या अनुषंगाने शासनाकडून गुन्हेगारांविरुध्द कोणती प्रतिबंधात्मक कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) माहे जानेवारी, २०१७ मध्ये खून, जबरी चोऱ्या, दुचाकी चोरी, घरफोड्या, चैन स्नॅचिंग, खून प्रयत्न/जिव घेणे हल्ले असे एकूण ८६ गुन्हे दाखल असून माहे जानेवारी, २०१८ मध्ये उक्त प्रकरणात ८४ गुन्हे दाखल आहे.

(२) होय, हे खरे आहे.

राजीव नगर झोपडपट्टीजवळ दिनांक २७/१२/२०१७ रोजी जुन्या भांडणाच्या कारणावरुन दोघांचा खून झाल्याप्रकरणी इंदिरा नगर पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. ३४८/२०१७ भा.दं.वि.क. ३०२, १४३, १४७, १४८, १४९ सह महाराष्ट्र पोलीस अधिनियम ३७(१)(३), १३५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून, यात ५ आरोपी व १ विधीसंघर्षीत बालकास अटक करण्यात आले. सदर गुन्हा तपासावर आहे.

तसेच, अंबड पोलीस स्टेशन हद्दीत दिनांक २७/१२/२०१७ रोजी जुन्या भांडणाच्या कारणावरुन १ खुन झाल्याप्रकरणी अंबड पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. ६४४/२०१७ भा.दं.वि.क. ३०२, १४३, १४७, १४८, १२०(ब) सह महाराष्ट्र पोलीस अधिनियम १३५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून यात ८ आरोपींना अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हा तपासावर आहे.

नाशिक शहरातील महात्मा नगर भागात दिनांक ०७/०१/२०१८ रोजी घरफोडी प्रकरणी, गंगापूर पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. ०४/२०१८ भा.दं.वि.क. ४५४, ३८०, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून, यात ४ आरोपींना अटक करण्यात आली आहे. सदर प्रकरणी एकूण रुपये २१,३५,०००/- चा ऐवज चोरीला गेला असून, त्यापैकी रुपये ११,००,०००/- चा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. सदर गुन्हा तपासावर आहे.

(३) शहरात आरोपींनी पोलीस असल्याचे भासवून फिर्यादीची फसवणूक केले प्रकरणी दिनांक ११/१२/२०१७ रोजी म्हसरुळ पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. २०२/२०१७ भा.दं.वि.क. ४२०,१७०,३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून २ आरोपींना अटक करण्यात आली आहे. सदर प्रकरणी रुपये १,००,०००/- चा मुद्देमाल हस्तगत करण्यात आलेला आहे. सदर गुन्हा तपासावर आहे.

तसेच, दिनांक ११/१२/२०१७ रोजी फिर्यादीला पोलीस असल्याचे भासवून रुपये ६०,०००/- ची फसवणूक केले प्रकरणी मुंबई नाका पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. ४२४/२०१७ भा.दं.वि.क. ४२०,१७०,३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर प्रकरणी १ आरोपीस अटक करण्यात येऊन रुपये १०,०००/- चा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. सदर गुन्हा तपासावर आहे.

(४) नाशिक शहरात अशा प्रकारच्या गुन्ह्यास आळा घालणेकामी नाकाबंदी, झोपडपट्टी चेकिंग, सराईत गुन्हेगारांवर लक्ष ठेवणे, पायी पेट्रोलिंग, मोहल्ला कमिटी, शांतता समितीच्या बैठका यांसारखे प्रतिबंधात्मक उपाय करण्यात येत आहेत. तरी शहरात नागरिकांमध्ये असुरक्षिततेचे कुठल्याही प्रकारचे वातावरण निर्माण झालेले नाही.
(५) विलंब झालेला नाही.

-----------------

## मुंबई महानगरपालिकेच्या शाळांमध्ये ध्वनीक्षेपक यंत्रणा बसविण्याच्या कामाबाबत

**(८२) * ४०१४९ श्री.नागोराव गाणार, प्रा.अनिल सोले, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.प्रविण दरेकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई महानगरपालिकेच्या प्राथमिक व माध्यमिक शाळांमध्ये ध्वनीक्षेपक यंत्रणा बसविण्यासाठी कोट्यवधी रुपयांचा निधी खर्च करण्यात येत असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महापालिकेकडे यांत्रिक व विद्युत तसेच देखभाल विभाग असताना या कामासाठी कंत्राटदाराची नियुक्ती का करण्यात आली आहे,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या ७२८ प्राथमिक शाळा व ४४ माध्यमिक शाळा अशा एकूण ७७२ शाळांमध्ये ध्वनीक्षेपक यंत्रणा बसविण्यासाठी रुपये १३.७२ कोटी इतक्या रकमेच्या कंत्राटास दिनांक १०/०१/२०१८ रोजी महानगरपालिकेच्या स्थायी समितीने मंजूरी दिली असून, दिनांक ०८/०३/२०१८ रोजी कार्यादेश देण्यात आले आहेत.

(२) सदर यंत्रणा बसविण्याकरीता व त्याच्या परिरक्षणाकरीता मनुष्यबळ पुरेसे नसल्याने, सदर कामाकरीता महानगरपालिकेमार्फत ई-निविदा मागवून कंत्राटदाराची नियुक्ती करण्यात आली असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत कळविण्यात आले आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मालवण (जि.सिंधुदुर्ग) येथील म्हाडा वसाहतीस पाणीपुरवठा करण्याबाबत

**(८३) * ४०८५९ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मालवण (जि.सिंधुदुर्ग) येथील कुंभारमाठ येथे उच्च मध्यम व अल्प उत्पन्न गटाकरीता म्हाडाने २७० सदनिका बांधून सन २००५ पासून लाभार्थ्यांना वितरीत करतेवेळी जीवन प्राधिकरणामार्फत वसाहतीस पाणीपुरवठा करण्याचे आश्वासन देऊनही सदरहू वसाहतीस अदयाप पाणीपुरवठा करण्यात आला नसल्यामुळे नागरिकांनी संबंधितांना वारंवार यासंदर्भात लेखी निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू वसाहतीसाठी जीवन प्राधिकरणामार्फत पाणीपुरवठा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश महेता :** (१), (२) व (३) कुंभारमाठ, ता.मालवण (जि.सिंधुदुर्ग) येथील म्हाडा वसाहतीस पाणीपुरवठा उपलब्ध करुन देण्याबाबत कोकण गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळाकडून मालवण नगरपरिषदेस विनंती करण्यात आली आहे. तथापि, मालवण शहर पाणीपुरवठा योजना (१९९९-२०००) ही जीर्ण झालेली असून ती वृध्दींगत करण्याबाबतचा आवश्यक तो प्रस्ताव मालवण नगरपरिषदेने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास सादर केला आहे. सदर योजनेत कुंभारमाठ म्हाडा सदनिकांना आवश्यक असणाऱ्या पाणीपुरवठ्याचे प्रमाण गृहीत धरण्यात आलेले आहे.

-----------------

## कुर्डुवाडी-बार्शी (ता.कुर्डूवाडी, जि.सोलापूर) रस्त्यावर चोरटे प्रवाशांना लुटत असल्याबाबत

**(८४) * ४०७०९ प्रा.डॉ.तानाजी सावंत :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माढा (जि.सोलापूर) तालुक्यातील कुर्डुवाडी-बार्शी रस्त्यावरील आराडा पुलावरील गतीरोधकांमुळे गाडीचा वेग कमी झाल्याची संधी साधून चोरटे तोंडाला मास्क लावून व शस्त्राचा धाक दाखवून प्रवाशांना लुटत असल्याची बाब माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त रस्त्यावर अशा प्रकारे लुटीच्या सहा घटना घडल्या असून यासंदर्भातील तक्रारी कुर्डुवाडी पोलीस स्थानकात दाखल करण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबनाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे. माढा (जि.सोलापूर) तालुक्यातील कुर्डुवाडी-बार्शी रस्त्यावरील आरडा पुलावरील गतीरोधकांमुळे गाडीचा वेग कमी झाल्याची संधी साधून चोरीच्या घटना घडल्या आहेत. याबाबत कुर्डुवाडी पोलीस ठाण्यात दिनांक २४/१२/२०१७ रोजी दोन गुन्हे व दिनांक ३०/१२/२०१७ रोजी चार गुन्हे असे एकूण सहा गुन्हे दाखल आहेत.

उपरोक्त गुन्हयांपैकी दिनांक २४/१२/२०१७ रोजी घडलेल्या एका घटनेत कोयत्याचा धाक दाखवून व धक्काबुक्की करुन अज्ञात आरोपी मुद्देमाल घेऊन गेले आहेत. याप्रकरणी गु.र.क्र. ५७२/२०१७, भा.दं.वि. कलम ३९४, ३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. उर्वरित गुन्हयांमध्ये आरोपीकडून कोणत्याही प्रकारचा धाक दाखविलेला नसून यातील फिर्यादी यांनी त्यांची वाहने अल्पविधीकरीता सदर ठिकाणी थांबविल्याचा फायदा घेऊन अज्ञात आरोपींनी चोरी केलेली आहे.

(२) हे खरे आहे.

(३) यासंदर्भात कुर्डुवाडी पो.स्टे. येथे दाखल गुन्हे पुढीलप्रमाणे :

दिनांक २४/१२/२०१७ रोजी

| अ.क्र. | गु.र.क्र. | भा.दं.वि.सं.कलम |
|---|---|---|
| १ | ५७१/१७ | ३९४, ३४ |
| २ | ५७२/१७ | ३९४, ३४ |

दिनांक ३०/१२/२०१७ रोजी

| अ.क्र. | गु.र.क्र. | भा.दं.वि.सं. कलम |
|---|---|---|
| १ | ५८९/१७ | ३९४, ३४ |
| २ | ५९०/१७ | ३९४, ३४ |
| ३ | ५९१/१७ | ३९४ |
| ४ | ५९२/१७ | ३९४ |

उपरोक्त सहा घटनांमध्ये सोनेचांदीचे दागिने, लॅपटॉप, मोबाईल, कपडे व रोख रक्कम असा एकूण रुपये ९,७३,६००/- किंमतीचा मुद्देमाल चोरुन नेण्यात आलेला आहे.

चोरीस गेलेला माल व अज्ञात आरोपीचा शोध चालू आहे. तसेच दागिन्यांबाबत माहिती मिळणेकरीता सराफ असोसिएशनला मुंबई पोलीस अधिनियम कलम १२६ अन्वये नोटीसा बजाविण्यात आल्या आहेत. गुन्हयाच्या अनुषंगाने संशयित अपराधी तसेच माहितगार गुन्हेगार, सराईत गुन्हेगार यांची माहिती घेण्यात येत आहे.

रिधोरे आरडा पूल येथील गतिरोधक हटविण्यात आला असून आता या ठिकाणी वाहनाचा वेग कमी होत नाही. तसेच या ठिकाणी रात्रीकरीता पोलिसांची गस्त नेमण्यात आली आहे. अशाप्रकारे गुन्हे घडू नयेत याकरीता संबंधित प्रभारी अधिकारी यांना सूचना देण्यात आलेल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :** **डॉ. अनंत कळसे**

**मुंबई.** **प्रधान सचिव,**

**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.